म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७६५



REFBK-0023894
REFBK-0023894

# हे माझ्या गवताच्या पात्या

नारायण कुळकर्णी कवठेकर

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

31 DEC 198[illegible]

[illegible] 2 NOV 198[illegible]

४ [illegible] १९८९

( क्रृ. मा. प. )
५०००–१२–८२

संदर्भ काव्य
२७७५
२३८९७
९२।७८३

# हे माझ्या गवताच्या पात्या

नारायण कुळकर्णी कवठेकर

मौज प्रकाशन
मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : ३०१

पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९८२

© १९८२, नारायण कुळकर्णी कवठेकर

मुखपृष्ठ : वसंत आबाजी डहाके

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मूल्य : चौदा रुपये

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या
नवलेखक अनुदान योजनेखाली
अनुदान मिळाले आहे.

माणसासारखं जगणाऱ्या माणसांना

REFBK-0023894
REFBK-0023894

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १४ | ९ | कसे ? | कसे |
| १४ | १० | बंडखोरीत | बंडखोरीत ? |
| २७ | ६ | शेवळांच्या | शेवाळांच्या |
| ३४ | १ | आहोटीच्या | ओहोटीच्या |
| ५७ | १५ (शब्द तिसरा) | ताडकन | थाडकन |
| ६८ | ३ | आपलं | आपण |
| १२८ | (अखेरच्या ओळीनंतर) | | घोळ : ५·४·८० : कवठा<br>शत्रू : १५·४·८० : कवठा<br>जमीन : २८·४·८० : कवठा<br>आकाश : २४·५·८० : कवठा<br>शिकवण : २·६·८० : कवठा |

अनुक्रम


१ वणवा
३ वेळा
४ आताशा
५ मी उभा
६ ज्वरग्रस्त दिवसांत
७ सामोरी
८ शब्द
९ डोळे
१० वाळवी
१२ तो
१३ वाट
१४ शाप
१५ खिडकीपार
१६ शेजारधर्म
१८ पक्षी
१९ एका सामान्याचे स्वगत
२१ शेजारचा अंधार
२२ संबंध
२३ निर्विकार
२४ आवाहन
२५ रंग
२७ दिंडी
२८ शेजारझाडे
२९ पहाट
३१ आयुष्य
३२ तर पुन्हा
३३ शतपावली
३५ आकाशहीन
३६ सुरुंग
३७ काही जण
३८ क्षितिजावर
३९ हरेकाच्या खांद्यावर
४० प्रारंभ
४१ ओहोटीचा खेळ
४३ निळाई
४४ एका रात्री
४५ खुर्ची
४६ गवत
४७ जत्था
४९ कावीळ
५१ उपदेश
५२ कविता
५३ गाव
५५ दु:ख
५७ असह्य
५९ उत्तर

पाच हे माझ्या गवताच्या पात्या

६० सावळी
६७ कंदील
६८ फाटकं
६९ अधांतर
७० फुले
७१ निवेदन
७२ प्रभात
७३ बाग
७४ घटना
७६ प्रीतीच्या शपथा
७८ झाड
७९ एखादाच क्षण
८० नंदीबैल
८१ भिंत
८२ डरपोक
८५ शर्यत
८६ बौद्धिक
८७ गढी
८९ वाघ
९१ शोकांतिका
९३ पाखरे
९५ मी येईन
९७ अखेर
१०० शिक्षण
१०२ श्वापद
१०४ ज्ञानप्राप्ती
१०५ संकेत
१०७ सभा
१०८ फुलं फुलं
११५ सावज
११८ घोळ
१२० शत्रू
१२२ जमीन
१२४ आकाश
१२६ शिकवण

१२७ लेखनकाळ व स्थळ

*माना कि इस ज़मीं को न गुलज़ार कर सके*
*कुछ ख़ार कम तो कर गये गुजरे जिधरसे हम*

*—'साहिर' लुधियानवी*

६० सावळी
६७ कंदील
६८ फाटकं
६९ अधांतर
७० फुले
७१ निवेदन
७२ प्रभात
७३ बाग
७४ घटना
७६ प्रीतीच्या शपथा
७८ झाड
७९ एखादाच क्षण
८० नंदीबैल
८१ भिंत
८२ डरपोक
८५ शर्यत
८६ बौद्धिक
८७ गढी
८९ वाघ
९१ शोकांतिका
९३ पाखरे
९५ मी येईन
९७ अखेर
१०० शिक्षण
१०२ श्वापद
१०४ ज्ञानप्राप्ती
१०५ संकेत
१०७ सभा
१०८ फुलं फुलं
११५ सावज
११८ घोळ
१२० शत्रू
१२२ जमीन
१२४ आकाश
१२६ शिकवण

१२७ लेखनकाळ व स्थळ

*माना कि इस ज़मीं को न गुलज़ार कर सके*
*कुछ ख़ार कम तो कर गये गुजरे जिधरसे हम*

—'साहिर' लुधियानवी

## वणवा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

कललेल्या कळसातून
पुजाऱ्याच्या व्यभिचाराचे ओघळ;
माती पेटवून ठोकली जाणारी
आकाशाच्या नावाची बोंब;
पल्लेदार आवाजाची चांदीरूप बैठक;
नथ घालून श्वासाला
लांबविलेल्या हाका;
उद्दाम दंडितांचे बेरहम चेहरे;
चौकड्यांच्या चौकटीत बंदिस्त समया;
दुहेरी उपयोगी लसलसत्या हिरकण्या;
बेताल स्वरात (की सुरात)
गुणगुणाऱ्या खाटा;
विश्व सांधण्यात गुंतलेल्यांची
उसवलेली माती;
वळचणीखालच्या विंचवासारखी
धरणीवर पांघरलेली आकाशाची साय;
लोंबलेल्या चामडीत
अवकाश जिंकल्याच्या तुताऱ्या;
रक्तप्रवाह खेचून सोडलेले शब्द
जसे वाळलेल्या काडीचे सहावे बाळंतपण;
स्वत्व फेडणारे
स्वस्त चंदेरी संस्कार;
विवस्त्र कातडीवर ओंगळलेली

खुपरी शृंगारशतके....

आणि या सगळ्यांत विरणारा
झाकपहाटेच्या अंधारासारखा
मी.

## वे ळा

पहाट पहाट पहाटणारी :
पांढऱ्याफटक कपाळांना कुंकू वाटणारी;

दुपार दुपार दुपारणारी :
पावडरीच्या रंध्रांना घाम चारणारी;

सांज सांज सांजणारी :
भकासलेल्या डोळ्यांना निर्शनात गांजणारी;

रात रात रातणारी :
उजेडाला वस्तरून आरशावर मातणारी.

## आताशा

आताशा उन्हे पडतात मरगळल्यासारखी.
तो पेलून धरतो अवजड आकाश
करंगळीवर,
संकेत झालेत सगळे संदर्भहीन.
इतिहासजमा वारे मुठीत धरण्याचे
यत्नही विफल.
बंगाल्यांच्या पाठीवरील जखमेसारखा चंद्र
नि ठिबकणारे चांदणे.
....तो दरदरून फुटतो,
दहा बाय दहामध्ये पॅक करतो स्वतःला
नि डोळे मिटून घेतो काढून करंगळी
हलकेच.

## मी उभा

कुठलाही वाद
पेललाच नाही नाजूक पाकळीला,
शब्दांचे बुडबुडे
उठवता नाही आले आकाशभर,
सगळे काफिले साथीचे
पोचलेत त्या हेलावल्या क्षितिजापाशी.
रखरखीत रानोमाळ पोकळीत
मी
उ
भा
कुणीतरी खोवून गेलेल्या
नि
शा
णा
सा
र
खा.

## ज्वरग्रस्त दिवसांत

या ज्वरग्रस्त दिवसांत
जीभ थोराड झालीय,
नकोसे झालेय समोर हे आकाश आवाक्याबाहेरचे,
अस्तित्वाचे साधारणधर्म
कोणी ओरबाडून घेईल तर बरे,
बिनचूक येणारे हे तालेवार क्षण धनकोसारखे
स्वतःचा असहनीय विस्तार दावतात,
या विराट कवेत श्वास घुमसतात,
कडा आणि दरीच्या कात्रीत
माणूस शोधतो मग अस्तित्वाची कारणे....
आणि वाऱ्याला हाती पकडणे
किती कठीण असते
अशा ज्वरग्रस्त दिवसांत!

## सामोरी

म्हाताऱ्या आभाळासारखी
कंबरेत दुखावलेली कुडाची झोपडी;
सूर्य टेंभलतोय
स्वतःच पेटल्यागत;
झोपडीत तिच्यात
डब्यांत त्याच्यात
पोकळी :
पोकळीत भुभुत्कारी शंख.
तिडीक डोळ्यांत टाचल्यासारखी
अंगठातुटकी वहाण
तो पायात अडकवतो,
गुमान निघतो समोरच्या
अत्यं-त्यं-त्यं-त्यंत लांब वाटेने.
ती जाईल काय नुस्तीच
फाटक्या पदरात बांधायला
खळगीला शिव्याशाप देत निघणारे
बरगड्यांतून ओघळणारे प्रवाह त्याचे ?
ती कोनाड्यातला कुठल्याशा
देवीचा फोटो करते उलटा,
डोईवरला पदर आणते खांद्यावर
आणि येते बाहेर झोपडीच्या
दुष्काळाच्या चवचाल हवेला
सामोरी जात.

## शब्द

ही ऊर्मी
अधूनमधून अचानक येणारी निनादत
आतमधून बाहेर पसरत क्षितिज गाठते
तेव्हा विकल डोळ्यांत घोंघावतो
एक निःशब्द कल्लोळ.

तो जेव्हा
थं
डा
व
तो
युद्धोत्तर सायंकाळसारखा
तेव्हा शब्द धारातीर्थी पडलेले असतात.

## डोळे

जगातील चिरंतन सत्येच
खोटी ठरायला लागली म्हणायची.
तुझ्या वक्षीं गोंदलेले
माझे डोळे कुठाहेत ?
डोळे
जे मिटणार नव्हते
तुझे ऊर फाटले तरी !

# वाळवी

वाळवीच असेल पाहायची लागलेली तर
वस्त्रे कोरी ठेवावी तरी कां जपून घडी करून;
कुठल्या मंडीत करावी देवघेव आता
विक्रेतेच बसले सजून दुकानादुकानातून;

हट्टी अश्रूच पाय टाकतात बाहेर
आच देणाऱ्या मजबूर माहेरावर रुसून,
पाहत राहतात मग लंबोळे डोळे
धगधग धूर ओकणारे शहराशहरातून;

झुकवावी लागे मानच भिजविण्या बाही;
या बर्फझडीतच कां एक निष्पंद ठिणगी :
उगीच यादगार फुलासारखी वहीतल्या
मृत त्वचेवर फिरून म्हणते—उगी उगी;

दर्दजर्द चंद्राची पेंगुळलेली आभा,
मातीच उलटते पायतळीची शिरजोर
मुजोर होतो अन् अंधारआरसाच,
क्षीण होतीशी दूरात कुठेतरी एक कोर;

कधी कपर्दिकेचे भुकेले शिवशिवते हात
सोसून अंतरात विकराल काळकळा
होतीलही विजिगीषू कालजयी तर
कुणी सांगावे भोवळतील खुद्द वेळा;

श्रावणाची स्वर्णवर्षा, नवेली हिरवी धरा,
चंद्रफुलेमाती सारे उठतील कात टाकून;
कसा भरभरून प्यावा तृप्त आसमंत
ग्रीष्मच गेला असेल जर डोळे खुडून.

## तो

तो विकाटीक करून शेवटच्या खाली भांड्यांची
लिलावून सक्ती-आसक्ती भान-चेतनादी भौतिक वस्तू
माझ्या दारी पडलेला असतो.
अंधार बाहेर लोटू पाहतो मी तेव्हा. रात्री.

तो म्हणे आभाळ होता ज्याला जगाने
चिलमीच्या छापीत बांधण्याचा प्रयत्न केला
किंवा खिशात कोंबण्याचा.
त्याच्या व्यक्तिगत सुखाची परमावधी
सामाजिक दुःखात झाली म्हणे.

त्याची उखळली वीट-वीट माझ्या मंदिराला,
त्याच्या डोळ्यांतली एकदम हिमालय झालेली ज्योत
कळस.
मला जपणाऱ्या बाहुल्यांचा रोष त्याच्या
सुईच्या अग्राएवढ्या हक्कावर.

डहुळत्या वेळेला पुचकारत रात्र ओलांडते मला.

पूर्व झेलण्यासाठी उघडतो मी कवाडे :
विकाटीक करून शेवटच्या खाली भांड्यांची
लिलावून सक्ती-आसक्ती भान-चेतनादी भौतिक वस्तू
लाल सही ठोकून माझ्या उंबरठ्यावर
तो पडलेला असतो.

## वा ट

वाट पाहू नकोस की येईल कोणी
रानहिरवे डोळे उकलीत
अन् ठेवील उशालगत एक स्वप्नगाथा.
अरे अशा काळोखात
जिथे चंद्र यायला भितो
तिथे विझत्या नजरांचा पाड काय ?
नाही म्हणायला जर
बोलू-चालू लागला खुद्द अंधारच
तर डोळे सताड उघडे ठेवून
काळ्या मांजरीची वाट पहा.
ती निश्चितच येईल.

## शाप

या रस्त्यांची वक्रदृष्टी
थिजवून टाकते उत्फुल्ल फुलांची गाणी.
कुठली मेहेरनजर आठवावी आता
आसवेच बेइमान झाल्यावर?
निरभ्र लख्खताच तेजाळून झाकोळते डोळे
तर दिठीच्या पल्याडचेच जग करावे काय आपलेसे?
विस्तवल्या दिशांनीच वटारले डोळे तर
पिंजल्या पावलांनाच हिणवावे कसे
आणि हे होणे कसेनुसे विसरावे तरी कसे?
गात्रांच्या चवहीन बंडखोरीत
आतल्या पोकळीला
निःशब्दाचा शाप असताना?

## खिडकीपार

या खिडकीपार काय आहे कोण जाणे.

विभक्त पावलांची रास
की सलग साथीच्या रक्तखुणा....
दिग्भ्रमित चंद्राची नागमोडी वळणे
या घनगंभीर पोकळीत....
सूर पाझरतात हाडाहाडात निःश्वासांचे....
दूरचा दिवा कसा राखण
या व्यभिचारी रात्रीच्या दारावर....
हे उसनवारीचे तुकडे आभाळ नासवणारे....

या व्रतस्थ डोळ्यांना काय झालेय ?
ही संयमी श्वासाची दिशा कां पालटली ?
हे मेरुमंदार कुणा हातून सुटलेत
की होतोय चक्काचूर चातकाच्या तहानेचा ?
ही भूक होतेय अनावर अमिट....
हे रस्ते ही झाडे या इमारती झेपघेऊ....
ही चरचरणारी हवा डोळ्यांच्या कडाकडांनी....
आपल्याच स्पर्शाने दचकणारी गात्रे....
आरसा तडकविण्यास निघालेले डोळे....

या गजांआड संपूर्ण नग्न मी माझ्या विश्वात.
या खिडकीपार काय आहे कोण जाणे.

## शेजारधर्म

माझ्या बापाने पोसलेला शेजारधर्म शेजाऱ्यांनी ओटीत घेतला.
शेजाऱ्याच्या कपाळाला फुटत असे घाम तेव्हा माझा बाप
धावत असे कुंपणाच्या पल्याडही अन् आणायचा कुठून तरी
वडिलोपार्जित मात्रा आणि द्यायचा उगाळून.

आमच्या घरामागचा आमचाच रिकामा वाडा कामी पडायचा
शेजाऱ्यांच्या तरण्या पोरींना धुडगूस घालायला
अन् मी तेव्हा माझ्या सर्वज्ञ बापाच्या स्थितप्रज्ञ चेहऱ्याकडे पाहत
डोळे किलकिले करीत असे—पाय जमिनीला घट्ट रोवून.

माझा बाप पुढे सरकारी इमारतीच्या बांधकामासारखा ढासळत गेला
आणि शेजाऱ्यांच्या मायेची बोटे माझ्या कपाळाला चाचपू लागली.
(शेजाऱ्यांची माया पोलिसाच्या गस्तीइतकीच प्रामाणिक असते काय ?)

मी एकदा शेजाऱ्यांना म्हणालो होतो की पालीचे वटवटीत डोळे
म्हणजे काय ? किंवा वरणात झुरळ निघाले तर काय होते ?
तर साऱ्या शेजाऱ्यांनी कळसूत्री बाहुल्यांसारख्या एकमेकांकडे माना
वळवल्या होत्या व म्हाताऱ्या नवऱ्यापासून फारकत मिळालेल्या
मनुबाईसारखे हसले होते.

माझा बाप आता अवशेषरूपात होता आणि शेजारधर्माचा संपूर्ण ठेका
शेजाऱ्यांनी स्वतःकडे घेतला होता. त्याला पुन्हा उठवून बसवण्यासाठी
शेजाऱ्यांनी मला सांगितले कुंपणापल्याड जायला आणि मी निघालो
तेव्हा सारेजण अवकाळी आभाळासारखे ढसाढसा रडले.

मला कुंपणापल्याड जायलाही वेळ लागला आणि मी वाऱ्यातला
पाचोळाही झालो. मी माझ्यातच आरबळलो. बावचळलो.
या चौकातून त्या चौकावर. सिविललाइन्सवरून कालीगल्लीत.
एक फांदी सुटलेली चिमणी माझ्या सोबत रात्री भिरभिरत असायची.

मी वापस आलो तेव्हा ओळखलेही नाही कुणी मला
जणू रंग माझा उडला वा पालटला होता. अवशेष आता अशेष झाले होते.
माझ्या घरावर झेंडू माजले होते, गवत डोलत होते.
आणि शेजाऱ्यांनी गायी-बकऱ्या पाळायला सुरुवात केली होती.

## पक्षी

दिवेलागणीला एक पक्षी आक्रंदत असतो
निंबाच्या झाडावर.
मी कधीच उकलून दाखवला नाही माझा आरसा त्याला.
त्याच्या क्रंदनाच्या धारेवर ताल देतात या खुंट्या, खिळे,
माळवदाच्या कड्या नि पाट्या.
एक हल्लकल्लोळ रात्रभर या दिवाभीत पोकळीत.
या पक्ष्याला हेही आहे माहीत की
जाणाऱ्या अंधाराबरोबरच एक सावलीही उठून जाते
माझ्या उरावरून, धुके बनून तो जातो तेव्हा.
दिवेलागणीला एक पक्षी आक्रंदत असतो निंबाच्या झाडावर.

मी खदखदतोय या धरतीच्या उरात,
धग उभ्या विश्वाची तळहातावर घेऊन मी अशांत;
प्रासादांच्या निऱ्या उस्कटायच्या नाहीत मला,
मला शोकेसेसमधील आत्मे मोकळे करायचेत.

अंगाराला शेज करून पेज पिणाऱ्या आयांची शपथ—
मी त्यांच्या गर्भांना औरस बनवीन सारे श्लेष उद्ध्वस्त करून
मी लिहीन एक निळंकारी गाणे, मी डोळ्यांच्या भाषेला लिपी देईन.

आश्वासनांवर श्वास मोजून श्रीमंतीची आरास कल्पणाऱ्या
भाबड्या डोळ्यांची शपथ—मी त्यांना चटईचे राजपुत्र करीन,
मी लावून देईन त्यांचा विवाह लंकेच्या पार्वतीशी.

दर साल दर माणशी एक रुपयाप्रमाणे पाच साल मुदतीसाठी
जी विकली जातात—रिकामी पोटे असतात त्यांची ती, आत्मे नसतात;
एक रिकामे पोट शेवटचा श्वास मोजताना दिव्याच्या वातीसारखे
उंच जाऊन सांगून गेले मला की सरकू लागते पायाखालची वाळू
आणि कमी पडू लागते टाळूवरचे लोणीसुद्धा तेव्हा होते राजभवनातून
आकाशवाणी गरिबी हटावसारख्या श्रीमंत घोषणांची.

कुणा निरपराधाच्या पाठीत खुपसत असता तुम्ही
तुमची निर्ढावलेली सनातन संगीन तेव्हा तुम्हांला अदमास नसतो
त्याच्या वंशजाच्या हातांवरील चक्रवर्ती चिन्हांचा.

हवा पाणी अन् जमीन या वाटून घेण्याच्या गोष्टी आहेत

असे बोलले जाते खुलेआम ज्या पिढीसमोर
त्या कच्च्याकोवळ्या मातीत मी रुजवीन की
चाकाच्या बहुरंगी आऱ्यांना सांधून असतो कैकयीचा मजबूत हात,
प्रत्येक विझत्या घरातील अंधारास जडवलेली असते गांधारीच्या
डोळ्यांतील दीप्ती आणि गंगा म्हणजे तर हिमालयाला फुटलेले हसू आहे.

फुफाट्याच्या वहाणा तिन्हीत्रिकाळ पायांत घालणाऱ्या बिनतक्रार
पावलांची शपथ—साऱ्या पाऊलवाटा नेईन मी राजपथावर
आणि त्या वेळी ही पांढरी राजवस्त्रे कफन होऊन जातील.

आणि त्यानंतर ?....विचार करतोय मी....त्यानंतर
गोकुळातल्या वासरांसारखी धावतील उघडीनागडी पोरे
झोपड्यांमधून सैरावैरा रस्त्यांवर
आणि वाहतूकनियंत्रक पोलिसाची पंचाईत होऊन जाईल !

## शेजारचा अंधार

शेजारच्या अंधाराचा श्वास आता उधळलेला.
माझ्या किरमिजी शालीत थंडीचा अपमृत्यू,
तुझ्या स्तनांचा माझ्या हातांचा श्रीमंत सेतू.
शेजारच्या पोटाचा अंधार सांधतो चिरा निखळलेला.

कौतुकाने भरवतो येणाऱ्यांना अडवत्या मोत्यास.
शेजारी येणारांचे खणखणारे कवतिक,
ओठांवर हसू चोळीइतकेच अगतिक.
शेजारचा निःश्वास ! (मोत्याच्या घासाचा गेला वास ?)

नाही सूर्याचा दम की द्यावे डोळे तुला अंधारा.
उचलावा अश्रू तो भिजेल भरेल अंगठी,
थोडी आतली थोडी बाहेरची आडकाठी.
तोवर जागवण्यास शेजारी आला उजेड म्हातारा.

चोरांनी खुडून नेल्यानंतर व नियतीच्या विनोदी हातांतून
बचावलेली फक्त दोन मण ज्वारी घेऊन मी घरी आलो
तेव्हा बाप घर विकायच्या बेतात होता.
त्याच्या कलत्याकोसळत्या बुबुळांस मी
शब्दांचे टेकू देण्याच्या प्रयत्न केला तो बाप भडकला.:
साऱ्या दुनियेची लक्तरे धुवून काढली अर्वाच्य शब्दांनी
(मला जन्मू घातल्याचा अहंकारही टपकून गेला त्यातून).
खरेदीविक्रीसंघाच्या ओट्यावरील भावाच्या चढउतारावाणी
ही जगभुलावण आणि बापाला द्यायची होती
उरलेल्या चोथारूप आयुष्यालाही सणाची कळा
माणूसपण अंगठीत तोलणाऱ्या आणि तुक्याचे अभंग
तिन्हीत्रिकाळ बोलणाऱ्या सरड्यांसाठी.

....डोळ्यांत मिरचीची पूड तशी आईच्या पिचत मरण्याची आठवण....
एका क्षणात तडकून गेले माझे डोळे आणि
बापाचा जबडा केव्हा तुटून आला माझ्या हाती हे मला कळलेही नाही.

## निर्विकार

गतिमान सुरईच्या निर्विकार हातातून मागे पडलेले थेंब
जखमेतील काचतुकड्यांप्रमाणे बसतात रुतून
धुआंधार अंधाराच्या गर्भाशयात. वेदनेची प्रभावक शक्ती
धरते ताल आणि नाचू लागतात पडक्या वाड्यातले अवशेष.
आक्रोशाचे आरोह-अवरोह रेखताना श्वासाच्या लेखणीलाही
धाप लागते. नस चिरून तिखट भरल्यासारखी
वेळावते प्रत्येक वेळा—ओसरलेली.
चिंब उशीच्या ज्वालांचा पापण्यांवर जळतो अभिसार
नि अंधाराला गवसणी घालतात थिजलेल्या डोळ्यांची पाखरे.
मुरत जाते रुसलेल्या धगीत प्रेताची थंडता
आणि वाट सुटलेल्या पायांची अढी घट्ट होते अधिकच.
स्वप्नांच्या राशी वादळात उद्ध्वस्त घरांसारख्या पडलेल्या.
एक एक काचेचा आवंढा गळा रिचवून घेत असतो स्वतःत
पतिव्रतेच्या नवऱ्याच्या अत्याचारासारखा. निर्विकार.

# आवाहन

पाशवी वाऱ्यास मुठीत बंद करण्याच्या
माझ्या प्रयत्नास जर हसतील दात विचकून
दैवी वरदानाच्या मद्याने झिंगलेल्या पारंब्या
तर हे माझ्या गवताच्या पात्या, तुडवल्यानंतर
पुन्हा मान उचलायचे तू विसरू नकोस !
नवथर स्पंदनांचा प्रलयसूर्य
अजून दुर्बोध आहे निशापतीच्या सहकाऱ्यांना.
आयुष्याचे गाभारेच भरलेत रेलचेल ज्यांनी
कोवळ्या पालव्या खुडून आणि ज्यांनी साजरा केलाय
कुठलाही जन्मोत्सव नव्या भक्ष्याच्या आनंदात—
त्यांना अश्रूचे महत्त्व नाकारणे तर सहजसाध्य आहे.
पिचलेल्या सांजेवर एक गरीब दीप उजळताच
हादरते त्यांच्या मौलिक पोथीची बांधणी
आणि तडकू लागतात सुखवस्तू कातडीवर भेगा
तेव्हा दिलजमाईच्या नव्या शीर्षकाखाली झिमझिम
बरसवल्या जाते चाळलेल्या शब्दांचे सोनेरी चांदणे,
त्या वेळी हे माझ्या उत्तररात्रीच्या घटिके,
काळोखाच्या केसाळ विटांमध्ये चिणलेल्या तुझ्या
श्वासांना स्मरून, वाळू निसटल्याचे विसरून,
तू पहाटेची मूठ घट्ट ठेव !

एक केशरी रंग मूळचा नव्हता :
मग मला त्यागाचा पुतळा जिवंत वगैरे बनविण्यासाठी
मोठ्या कष्टाने बापांनी विविध रंग एकत्र करून
कुशल चित्रकाराच्या परिश्रमाने काढला शोधून, ठेवला घोटून.
मला आनंद वाटला. त्यांचे पुतळे मी उभारले हृदयात आदराने.
—पण मग मलाच बाजूला सारून ते मला पटवून देऊ लागले की
त्या रंगाचा जनक 'हा नाही, मी आहे', 'हा नाही, मी आहे'....
(बाप कोण म्हणून विचारण्यासाठी मागे वळून पाहावे
तर आईने जीव दिलेला असावा, तसे काहीसे झाले मला.)
—मी निर्विकार मनाने समोरून नजर हटवली आणि बसस्टॉपवरच्या
प्रेयसीकडे पाहून गुणगुणू लागलो : तेरा तन प्यारी....केसरक्यारी....

पांढऱ्या रंगाची गंमत थोडी वेगळी आहे :
धर्मराज एकदा खोटे बोलला होता (असे त्यांनीच मला सांगितले)
म्हणून त्यांनी मला हरिश्चंद्र बनवायचे ठरवले आणि स्वच्छ
पांढराफेक कलर तयार केला माझ्यासाठी. मी भारावून म्हणालो की माझ्या
कातडीचे जोडे तुमच्या पायात घातले तरी हे उपकार....वगैरे....वगैरे....
—मग ते डोक्याने पांढरे आणि रंगाने काळे पडू लागले कालांतराने
तेव्हा त्यांनी मला स्मरण करून दिले माझ्या कृतज्ञतेचे
आणि माझा शब्द फुटायच्या आत त्यांनी प्रवेश केला माझ्यात
आणि काहींनी माझी कातडी ओरबाडून चढवून घेतली स्वत:वर.
—आता पांढरा रंग ते स्वत:साठी वापरताहेत.

## दिंडी

फितुराच्या इमानासारखे भोवताली खच्चून पडलेले कुसुमपाश,
अजून एका हाडात रुतलेल्या जखमेची ठणकच तरी प्रभावी आहे.

रक्ताच्या पावत्या घेऊन वेळेच्या वेश्या उठून जातात सावकाश :
केवळ हाडांच्या जोरावर उभे केलेले घर या देशात निनावी आहे.

रोरावतात चंद्रबेटांवर हिंसक प्रेरणांचे धनी, थरारतेय अवकाश,
सफल होताहेत शेवळांच्या प्रार्थना आणि भूकंपांना घाई आहे.

श्वासांच्या कुबड्यांवर प्रलयाची वाट पाहत अवघडलेले आकाश,
दिंडी माझ्या युगाची तरी आजारातील रात्रीसारखी पायी आहे.

## शे जा र झा डे

कोसळून
खाली झालेले आभाळ
दिलदार दुष्मनासारखे
झोडून निघून गेले.

त्या आभाळाचे उसने थेंब
टपदिशी पाडीत
आपलीच शेजारझाडे आता
कातडी थरारवितात.

## पहाट

लाटांवर लाटा येत राहतात आणि संतासारखा
निर्विकार किनारा वाळूची पर्वा करीत नाही;
हाती हात देत नाहीत या होड्या
आणि दीपस्तंभाचे चौफेर इशारे
मुक्याच्या हाकेसारखे दुर्लक्षित होतात.

रस्त्याच्या कडेला एका पुडीत
वाढलेली नखे संशोधकाची वाट पाहत मुकी आहेत
आणि जिरून गेलेल्या संज्ञेच्या पोकळीत कण्हतोय आत्मा,
मुजोर प्राक्तनाच्या वेळावणाऱ्या पारंब्यांची दाढी
काखेत गुदगुल्या करतेय,
टोळधाडीच्या भयाने थरारत्या शेतांमध्ये
हात उचलण्याचे त्राण नाही.

एका संथ विषप्रयोगात भागीदार निष्क्रियता
जी कातडीवर खोदल्या गेलीय आणि निःश्वास
हे नाकाचे एकमेव अपरिहार्य कार्य समजल्या गेलेय.

वेशीपल्याडच्या हाका कानांपर्यंत पोचू नयेत
असे काचांच्या परकोटांचे बंदोबस्त
आणि छावणीतले साथीदार उपकृत झालेत
दो गिलास नशेत.

मध्यरात्री तारा तुटल्याची किंकाळी
आणि ती ऐकून सावरून बसलेला फकीर
सोयिस्करपणे जवळच्या धोंड्याकडे दुर्लक्ष करीत आहे
आणि घसा बसलेले कोंबडे पहाटेची वाट पाहत आहेत.

## आयुष्य

आयुष्य कसे उद्ध्वस्त होत गेले चरितार्थाच्या प्रश्नांबरहुकूम.
जुळवत आणलेले धागे तुटत तुटत गेले कारण नसताना.
कुठल्याच गोष्टीचे लगाम हाती नव्हते—स्वत:चेसुद्धा.
'कधीमधी येणारे प्रामाणिक आक्रोशही गोठून गेले
नकली विस्मरणप्रयोगांच्या गर्तेत. सुपाएवढे मन करून
जगण्याचे सारे प्रयोग हास्यास्पद झाले
आणि पावले पिंजून काढणाऱ्या रस्त्यांची जवळीक वाढतच राहिली.
मैनेची साद—एक भुलावण, पाखरांचे थवे—एक हुलकावणी,
साऱ्या क्षणांचे चेहरे वायुरूप...अशा कित्येक आठवणी.
देहाच्या हाका आणि मनाचे पापुद्रे तलम सांधताना
उगीच विझून बदनाम झाल्या चार डोळ्यांच्या कथा.
सांगूनही खरी वाटणार नाही आपलीच कथा आपल्याला.
आज ओळख नाकारेल आरसाही. आणि प्राक्तन ?
हा शब्द तर काही कारण नसताना लगडलाय प्रत्येक मुजोर झेपेला
आणि झेपा रोखणे तर प्राक्तनाच्याही अधिकारात नाही.

## तर पुन्हा

कोणी येण्याआधीच विझून गेल्या हाका,
सुन्न प्रतिध्वनी अधिकच भकासत गेले गाभाऱ्यास,
दिवसाउजेडी तोंड दाखवण्यास शरमणाऱ्या चांदण्या
रात्री डागत राहिल्या दररोजच.
कधीतरी तू यावेस म्हणून साऱ्याच प्रार्थनांची उजळणी
केली पुन्हा एकदा
आणि माझ्या दग्ध स्वरांवर सांजेची काजळी दाटत आली
तुझ्या हटवादी आठवणींसारखी.
आता आठवणींना चिळकांड्या फुटतील शब्दांच्या,
ओळीओळींतून दाटतील अमित आक्रोश;
वणवा पेटल्यागत गलबलून विखुरतील पाखरे,
रानोमाळ घुमतील विकल किलकलाट....
—आणि तेही ऐकायला तू नसशील तर पुन्हा रक्तप्रवाहात
वाहत येतील समजूतदार दिवे
आणि झड संपल्यानंतरच्या चंद्रप्रकाशासारखा
मंद सनईत राहील जळत उजळत गाभारा.

मरणाच्या रात्री मोजाव्यात तरी किती
अन् दिवसांतील आत्महत्यांचा ठेवावा कसा हिशोब.
जाळणाऱ्या ऋतूंची तक्रार नाही केली तरी
तमासगीर जगाचे कमी होत नाहीत आरोप.

आता जखमा चाचपतो निमूट फक्त
खाचखळग्यांत भेलकांडल्याची आठवण म्हणून,
हाताने घामेजल्या चोंभाळतो कपाळावरचे
कर्जाऊ रकमेसारखे न फिटणारे दुपारचे ऊन.

अवसेपुनवेला अवचित भडकतात
अंगभर गोंदलेल्या खोल प्राणांतिक खुणा,
जिभेवर साचते कडवट थुंकी फक्त
जी घेतो गिळून हुंदक्याबरोबर कोरड्या पुन्हा.

पाने-फुले चंद्र-चांदण्या दव-धुके
यांच्याशी नाही, नव्हतेच कधी माझे वाकडे,
पण धावले ऊन जेव्हा फांद्यांतून रणरणा
शब्ददेखील राखण्यास श्वास पडले तोकडे.

हे असे अन् ते तसे, दिलदारी नि दुनियादारी,
कैचीत दुधारी खचला आवाज माझा आतला;
बोटावरच्या थुंकीचा साधला खेळ नाही,
दूर गेले क्षितिज फक्त आता निरखतो एकला.

आहोटीच्या श्वासांचा हा निःशब्द खिन्न निरोप,
स्पंदनांची सादही गात्रांतली मंदावली;
न जाणे कोण्या लख्ख चमत्कारासाठी
हारलेल्या सावलीची ही तिमिरात शतपावली.

आकाशहीन

डोक्यावर आवळलेले करकचून आकाश उद्विग्न,
रक्तात ओसाड दुपार, सामसूम चौक, गल्ल्या नाकेबंद,
डोळ्यांत कुंद दिवस अवेळी विझल्याचा दमट आक्रोश रंगहीन,
ढासळत जाणाऱ्या तटासारखी आत मुकाट अवजड ध्वनियात्रा,
आपण पाय उचललेले, हात सुटलेले, लोळागोळा, हतबल,
भिरभिरवीत नजर अनोळख्या पोकळ प्रदेशात संदिग्धपणे,
तोडलेल्या संबंधासारखे फारकत घेणारे अश्रू थंडगार,
प्राणांतिक अपघात आठवल्यागत दचकणे स्वतःच्या आठवणीने,
आपण उठतो पिळवटून, आरोळी ठोकतो बेंबीचा देठ आक्रसून,
गरगरा फिरवतो बुबुळे, भोवळ येईतो पाहत लखाखता भक्क गोल,!
सामावून घेताना हे आकाश, या दिशा भोवळून येते त्वचा निसरडी,
लखकन् तुटते झुंबर, खळकन् विखुरतात भुलावे, दुरावतात आचके,
आकाशहीन आपण असतो अफाट सुन्न शून्यतेत अस्ताव्यस्त.
अनभिषिक्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७०५
दा. क्र. २३०८७
काव्य १२५५३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## सुरुंग

कुजवलीत त्यांनी पिंकदाणीत युगमूल्ये
अन् करताहेत ते सूर्य बदनाम विधवेच्या कपाळासारखा,
पापणीच्या इशाऱ्यावर ते तोलताहेत कैक आयुष्ये
अन् जिभेवर घोळवताहेत दंभलिप्त उसासे.

ते अंधारून ठेवताहेत घरातले तारे
अन् होऊ पाहताहेत स्वनिर्मित आकाशातले स्थिर सूर्य,
लाळेसोबत चघळताहेत कथा सामान्य हुंदक्यांच्या
आणि छापवून आणताहेत फोटो साळसूद कणवेचा.

त्यांना आहेत धोरणे मुकपाठ तुमच्या आमच्या
भाबड्या आंदोलनास मृगजळाकडे चळवण्याची
आणि पारंपरिक पडदे टाकून पहाट धूसर करण्याची.

कोसळत्या गल्ल्यांमधला आक्रोश अन् अस्पृश्य
स्पंदनांचा कळवळता नाद सहजपणे मिटून जातोय
त्यांच्या वैश्विक घोषणांच्या पोकळ नगाऱ्यात.

आता आहे वेळ की सोडून आपापल्या ढोल्या
आक्रमावी एकच दिशा दमदारपणे अन् उक्तीतला
आवेश न दवडता आणून मनगटात टिपत जावा एकएक
सनातन तंबू, घेरावी एकएक सुखव्यस्त राहुटी.

आपण होऊ या एक जिवंत सुरुंग
त्यांच्या निबर हटेल बुडांसाठी !

## काही जण

चार दिवसांनी सरणारे आयुष्य घेऊन
काही जण आभाळ आक्रमताहेत :
झाडांनी सोडलेत पानांचे अश्रू
अन् मातीच्या पोटी गहिवर दाटताहेत;
रानातल्या पाऊलवाटांवर ठसे
उमटताहेत लालभडक, वाळताहेत;
कातडीच्या भेगांत घुमतोय वारा,
टिचलेल्या हाडांतून सूर फुटताहेत;
नदीने घेतलेय समजूतदार वळण,
वाळूची घरे डोळे विस्फारताहेत;
मैलाचे दगड, ओळखीच्या धर्मशाळा
नात्यागोत्यांसारख्या मागे पडताहेत....

## क्षितिजावर

सरत्या रात्री थर्थरून श्वास हुंकारले
आणि मी पुलकित झालो पहाट डोळ्यांपुढे ठेवून,
मौन पानांवरचे दव पापण्यांस लावले
आणि सिद्ध झालो जागृत दिशेकडे जायला.

पुढ्यात येऊन आदळली दाणकन् चंद्रमौळी सत्ये
रक्त पिऊन वाढणाऱ्या कवितांसारखी.
भान हरपलेली पाखरे पुन्हा लालचावली,
निळी साद उगवली पुन्हा उस्कटल्या पिसांत.

सारे आतड्याचे प्रश्न अन् गोठलेल्या पुतळ्या,
कळवळणारी जड सय अन् खुरडणारी पावले,
परिचित निबिड रस्ते अन् आंधळ्या गल्ल्या,
काळोखाच्या भिंती चिरेबंदी अन् उंचेल्या....

पण चाळीव धुके विरताना लालस रंगात
बहरून आलेली किलबिल फांद्यांच्या गजांमधून,
वेस ओलांडीत आसमंत हलवीत उगवता
दूर घंटेचा आवाज—क्षितिजावर रक्तगोलासारखा.

कर्कश स्वरसंभार थरारत जातो झंझावातासारखा,
वठलेल्या वृक्षाची शेवटची पालवी आंग आक्रसते,
दिवसाढवळ्या कोमेजतात सारे चंद्र गात्रांमधले
आणि सरत ओसरत वाहतो एक विषण्ण प्रवाह
दुपारच्या सुन्न गल्लीतील भेदरल्या पदचापासारखा.

कुबड्याच्या दुर्बळ आक्रोशावर उमटतात वळ
पडदे ओढलेल्या खिडक्यांच्या मुजोर गजांचे.
या शहरात आतडी सोलून टांगलेली तुझ्यामाझ्या
विकल भावना-वासनांची आणि बेताल लयीत
सुरू असते अविरत समूहगान विकलेल्या पक्ष्यांचे.

सारे विकलांग महारोगी आजूबाजूला वळवळावेत
आणि गुडघ्यांत तोंड खुपसून मुसमुसावी विधवा
तसा जड झालेला मी ठसठसणाऱ्या डोळ्यांनी पाहतो
ओंजळीतील रेषांच्या जाळ्यात—माझ्या स्वप्नाळू डोळ्यांनी
पाहिलेली अजाण पहाट कळवळताना.

नियमितपणे चूळ भरल्यासारखे माणुसकी समता
स्वातंत्र्य हे शब्द कोड फुटल्यागत पसरत जाताहेत
कवठा खुर्दपासून बम्बई बद्रुकपर्यंत.
तुझ्यात मला नि माझ्यात सारे विश्व शोधण्याची
ही मरमर तरी कशाला—हरेकाच्या खांद्यावर
या युगाचे कातडे वाळत असताना.

## प्रारंभ

रात्री झाडांवर काजवे चमकावेत तसा उलगडणारा मी
आतल्या आत उकलत जातो तेव्हा
चंदेरी पटावरच्या डागण्या आणि निखळलेले
सारे संभ्रम एका आश्वस्त अंधारात
दाखल होतात.
कागद टरकावून जाणारी प्रत्येक ओळ
जिभेवरच्या कडवट पुटासारखी
अंधाराच्या बिकट सान्निध्यात लगट करते.
टेबलखुर्च्यांच्या पार मी शून्यात वसलेला
ओंजळीत घेऊन साऱ्या नक्षत्रांची भाकिते
पिंजून काढतो भूतकाळातील हरेक वेदना.
सरत्या रात्रीचा शेवटचा प्रहर
डोळे सामावून घेतात.
बुद्धिबळाचे सारे मोहरे माना टाकून
निपचित असतात
आणि एका विराट पदयात्रेचा प्रारंभ सुचवतात
काजव्यांच्या जागी पहाटणारी हटवादी पाखरे.

ओहोटीचा खेळ

स्तनांची सफ़रचंदी चाहूल हातांच्या धपापल्या स्पर्शात,
वेगळी काढून ठेवलेली अनामत प्रतिष्ठा मुदतीत एका रात्रीच्या....
बिअरहून फेसाळ तुझे डोळे, ग्लासाहून खोल तुझे अंग,
प्रतिसादाला मार्जिन आखून अवघा देह स्वाधीन करून
तुला विसरता येणार नाहीत काटक्या मोळ्या फाटक्या चोळ्या.

घर थकवून आलोय थकून, तुला थकवण्यासाठी नाही.
तशी तू आलीस पराभूत, जाशील मोकळी निरपेक्ष पराभूत करून.
तू का शरमिंदी झालीस एवढी विवस्त्र केल्यावर तुला की
तुझ्या गोऱ्या पोटावर आहे केसाळ काळा रुपयाएवढा चट्टा.
आनंदाने तुला घुसळतोय की मला सापडलेय माझ्या आयुष्याचे प्रतीक.
तुझ्या छचोर अभिरुचिस्तव ऐक गाणे : कशी गवळ्यानं राधा घोळसली....

दर रात्री बदलणाऱ्या यारासाठी माझ्याजवळ नाही उपमा तुझ्या
जीवनातली (: एक लुगडे. एक चोळी. एक शरीर. एक कुंकू.)
माझ्या जीवनातली आहे : विद्यार्थ्यांना नियमितपणे लादून
ने-आण करणारी तेवीस नंबरची बस; ठराविक
काळानंतर निराळ्याचे कुंकू लावणारी ही साहित्यसंस्था;
सकाळी चहा दुपारी वरण रात्री दारू पिणारे कडतू गुराख्याचे भांडे.

संधिवात झाल्यागत आखडून घेऊ नकोस पाय अन् अभिनयांकित
करू नकोस चेहरा ओठ दाबून डोळे मिटून
पहिल्यांदाच सर्वस्व लुटवल्यागत.
निसर्गदत्त नासमझी अजून कवळून आहेस—तुझा दोष नाहीय तो.

तळहातावरील फोड टचकन फोडण्याइतपत निर्ढावलेपण अंगी
बाणवून मी अतिशय कटू सत्य सांगतो तुला काव्यमय भाषेत. ऐक :

तू सुंदर—उन्हे झेललेल्या फुलागत. मला आदर आहे तुझ्याबद्दल :
हरवून बसली नाहीस अजून अंगा-रंगातली वीज. मी पहा ना—
फसू नये पुन्हा कोणी माझ्या मायावी डोळ्यांमुळे म्हणून मुद्दाम
करून घेतला आहे चेहरा विद्रूप. तूही कशी, तुला वाटतेय
याच विक्षिप्तपणाचे अप्रूप. कशी बोलतेस तू
अजूनही रोमँटिक, छान. एरवी जाणतो आपण दोघेही :
निंबोणीने गिळलेला चंद्र. विजेची वाट पाहणारे ढग. ढगांच्या
प्रतीक्षेत आकाश. आणि हेही की
दोन ओहोट्या भरतीचा आव आणीत आहेत.

## निळाई

झरा आटल्यावर वाळू कोरडी झाली,
नाराज झुडुपांनी पिवळे डोळे उचलले,
रस्त्यापारचा धुळीचा लोट जखख
शरीराच्या उबळीसारखा उठला आणि बसला,
फक्क उन्हातल्या रस्त्यावर कापूस सांडल्यासारखे
दिसणारे ढग विरळ होत गेले
आणि सारे निरुपद्रवी जमीनवासी
मखखपणे निरुपयोगी निळाईस पाहत बसले.

## एका रात्री

थकलेल्या रात्रीवर धबधबतोय पाऊस,
रस्त्यावरचा शुकशुकाट कापीत येते पोलीसव्हॅन,
कोपऱ्यावरच्या घराच्या दुसऱ्या मजल्याच्या
प्रकाशणाऱ्या खिडक्या दचकून विझतात.

पायऱ्यांवर बुटांचा खटखटाट. दरवाजे धडधडतात.
मुसक्या बांधलेले चार जण पायऱ्यांत कोसळतात.

कोणी जागे नसते सुसाटत्या वाऱ्याशिवाय.
रात्रपाळीहून परतणाऱ्या वर्तमानपत्राच्या बातमीदाराची
सायकल रस्ता चुकवते निमूट.
व्हॅनच्या चाकांच्या चिखलातल्या चाकोऱ्या
पाऊस मिटवून टाकत असतो आधीच ठरल्यागत.

व्हॅन निघून जाते न आल्यासारखी.
एका झोपडीतून टिनाच्या दरवाजाच्या भोकामधून
एक पोरगे पाहत असते. व्हॅन जाताच समोर दिसतेः
भुंकणारी कुत्री चिडीचीप
त्या घराच्या जिन्याखाली—आश्रितासारखी.

## खुर्ची

रात्रंदिवस ढासळताना मी हसत राहतो उठल्यानंतर काही वेळ
खुर्ची हलत राहावी तसा. संध्याकाळची उन्हे खुर्चीवरही
रेंगाळतात. नजर वळवून मी रस्ता न्याहाळतो सुक्या डोळ्यांनी :
भरधाव जाणारा रिक्षा, आत बसलेली चिमुरडी शाळकरी पोर,
पानाच्या ठेल्यावरची रंगीबेरंगी गर्दी आणि गर्दीचे डोळे.
भिंतीवरच्या जाहिरातीतला चेहरा असे वाटते रोखून पाहतोय
माझ्याकडे. मीही डोळे घालतोय डोळ्यांत त्याच्या निर्भयपणे.
घरात चक्कर टाकल्याने फायदा नाही काही म्हणून गच्चीतच गच्च.
मग उगाच भास कां होतोय की पायाखालून सरकतेय काही....
घरात काही घडत असेल का....बरे घरात जावे तर
वाऱ्याने फडफडा उडतील कवितांच्या वहीची पाने
आणि विचार येईल : बाहेर खुर्ची हलत असेल का....

शहराच्या बाहेर गवत वाळके जमिनीत मान खुपसून
निळ्या उलट्या वाटीखाली गुदमरतेय—
काही रस्ते डांबरी काही सिमेंटचे गवताळ छाताडावर व्रणांसारखे,
ज्यावरून धावतात मोटारी धूळ उडवीत, माखीत चेहरा गवताचा.

शहराच्या मध्यभागात वाढताहेत धुरांडी आणि गवताळ प्रदेशावर
उभारल्या जाताहेत इमारती. आता आवारात लावली जातील नागफणी-रोपे.
कौतुकाने डोळे पाहतील ती
आणि हिरमुसल्या गवतावरून पार नजर फेकतील क्षितिजावर
आणि गुणगुणतील चिरक्या आवाजात नखरेल गाणे,
ज्याचे ध्वनी वारा नेईल वाहून, जे वाटतील गवताला ओरखड्यासारखे.

पावसाळ्यात गवत होईल हिरवे लुसलुशीत मातीसारखे तर घोडे येतील
मोकाट दौडत आणि तुडवतील सारा प्रदेश मस्तीत थयथयाट करीत.

गवताचा पावसाळा संपेल लवकरच आणि घोड्यांच्या टापांच्या खुणा
वाळून होतील कणखर, दिसतील जखमांसारख्या जुन्या.

आईबापांना चुकवून बाहेर पडतील इमारतीमधली पोरे कोवळ्या उघड्या
पायांनी नाचायला विस्तीर्ण मोकळ्या गवतावर तर गवत पुन्हा जाईल
हरखून पाऊस झिमझिमल्यागत; पण टापांच्या गड्डयात मुडपतील
पोरांचे पाय खेळताना, एक मुलगी जाईल रडत तळपाय छिलल्यामुळे,
तेव्हा इमारती वाढवतील आपल्या वंशावळी आणि राहतील उभ्या
पाऊस आणि गवत यांच्यामध्ये आणि त्यांच्या भल्याथोरल्या सावल्यांमुळे
गवत राहील वंचित उन्हापासूनही.

“पांढरा भकभकता समुद्र पसरलाय सगळीकडे,
पाचोळे भिरकटताहेत दिपलेले डोळे मिटून.
नांगराने भसभसा ऊर फोडीत जावे
तसा आजूबाजूचा प्रदेश विव्हळ होऊन पडतो आहे
आणि फाळ आपली गंजलेली लाल तोंडे पुशीत गरजताहेत.
गवताच्या गंजीसारखे भयभीत हे लोक
आणि सूर्य हसतोय पिसाटलेल्या आगीच्या लोळासारखा…”

—शेजारच्या गावच्या या बातमीपत्राच्या पिंगट पुंजक्यास कवटाळीत,
काळजातील ठणक्याचे अस्तित्व प्रमाण मानून, टाकीत जड श्वास
जत्था—शरीरापेक्षा डोक्यावरच्या केसांचे वजन जास्त असलेला—
चालतो आहे क्षितिजाला आवाक्यात आणण्याचा घोष करीत….

(यात्रेच्या पहिल्या मुक्कामातच भ्रमनिरास झालेल्यांचा चित्रपट
यांनी पाहिलाय; पण आयती पायवाट सोडण्याचे मनोधैर्य
असलेल्या नायकाची जुनी कादंबरी यांच्या हातून सुटलीय.)

जत्थ्याचे रंगीबेरंगी घटक चाललेत धूळ उडवीत उदास मस्तीत
घालून खिशांत हात. (सहजच लपून जाते मुठीवरील शिरांचे दौर्बल्य.)

हळूहळू होताहेत जत्थ्याच्या पापण्याही मलूल, दुखताहेत डोळे,
काही जण पाहताहेत वळून की गाव किती दूर गेलेय.

मधेच दिसताच गारपिटीची चिन्हे जत्था विस्कळेल
आणि वारा घोंघावला पाण्याबरोबर तर शोधेल आश्रय गटागटाने;
कुणी एकेकटे दडेल कपारीआड सुरक्षित, कुणी लपेल ढोलीत….

एखादाच राहील पाय रोवून ठणाणत तर त्याच्या हाकांबरोबरच
तोही कोसळेल एकाकी
आणि होईल वाऱ्याने उधळलेल्या पाचोळ्याखाली लुप्त.

जत्था परतेल वावटळ थांबल्यावर मान खाली घालून
आणि गावाच्या वेशीजवळ एखादे भाबडे पोर डोळ्यांत जीव आणून
विचारेल की एक जण दिसत नाहीय—तर जत्था बोलणेच टाकेल.

# का वी ळ

जर्द गवतावरून फिकट शिराळ पावले उचलीत,
म्हाताऱ्या निवडुंगांना चुकवीत माझे चालणे गतिशून्य.
वाळून कोळ झाडांचे उभे हडकुळे आकार.
पाचोळ्यावर माझ्या पदक्षेपांची
कातडी गळून पडत असल्यासारखी निष्प्राण चरमर.
सूर्याचे क्षयी ऊन पसरतेय क्षितिज पिवळट करणारे.
भक्क उजेडात प्रकाशाचा मंद ठिपका हलावा तसे चालताना
दर पावलागणिक मी चाचपून पाहतो
अधिकाधिक पिवळी पडत जाणारी माझी निरक्त नखे.
मरगळल्यासारखा वारा लुढकतोय
मनगटांवरील माना टाकलेल्या केसांवरून.
पिवळसर कातडीतून दिसणारे नसांचे मलूल जाळे.
पिवळ्या गायींचा निस्तेज पिवळा हंबर
हवेने हवेवर रेघ ओढल्यासारखा.
मी पिवळी बुबुळे लपवतो पापण्यांखाली,
लकवा मारलेला अंधार गिळून घेतो
चव गेलेल्या जिभेने शोषून....
ओठावरची पिवळी भुकटी भुरभुरत आत येते.

## उपदेश

झोपेतून उठल्याबरोबर सकाळी समजा तुम्हांला वाटलं असं:
की आपण आहोत आज अगदी मूडमध्ये.
दुपारी जेवू हॉटेलमध्ये, रात्री पाहू सिनेमा
आणि जाऊ झोपी एखादी चांगली कादंबरी वाचता वाचता.

माफ करा, पण या वर निर्देशिलेल्या
साऱ्याच गोष्टी आहेत आनंदी मूडचं खोबरं करणाऱ्या.
लहान पोरानं कठीण शब्दाचा अर्थ विसरावा
इतक्या सहजतेनं तुम्ही भुलताहात की
तुम्ही हँगर लटकवताच खिळा येतो निसटून,
तुम्ही जांभई देताच चिलट गुदमरतं घशात
आणि पोरीला हॉटेलमध्ये नेल्यानंतर
लक्षात येतं तुमच्या पाकीट घरी विसरल्याचं. असे तुम्ही.
असो.

या निसटत्या वेळा सजवण्याचा कांय एवढा सोस?
वेळेची मागणी पुरवणं म्हणजे नसतं दातृत्व वा कामगिरी मोठी.
रिकाम्या वेळात जुनी पत्रं चाळावीत
इतक्या शांतपणं समजून घ्यायचं असतं आयुष्य.

काही न केल्यामुळं न झालेला पराभव आनंददायी असेल.
हॉटेलातील जेवणात किडूक निघाल्यानंतरची जळजळ,
सिनेमा निघावा भिकार अन् तशात माजी प्रेयसी
समोरच्या रांगेत खिदळत असावी नवऱ्याबरोबर—ती चडफड

नि उत्साहानं हाती घेतलेल्या कादंबरीची पानं निघावी फाडलेली—
तो संतापः हे सगळं तुम्ही टाळू शकता.

निमूटपणं झोपी जा पुन्हा त्या मूडच्या कुशीत दीर्घकाळ.
डोळे उघडल्यास पाहा खिडकीएवढं आकाश.
आणि करावंसंच वाटलं काही तर वाचून काढा
तुम्ही कधीकाळी अधूनमधून लिहीत असलेली डायरी
जिच्या पानांवर तुम्ही केलेली असते नोंद—काहीच न केल्याची.

# कविता

पृथ्वी विशाल आहे
माझ्या बाहूंत

आकाश असीम आहे
तुझ्या डोळ्यांत

ही अपूर्व अनादि कविता
मी म्हणतोय
तुझ्या ओठांनी

## गाव

जसा येतो उन्हाळा नियमित—सालदारांचा, महीनदारांचा, रोजदारांचा,
हडकुळ्या गायींचा आणि शिंगे मोडलेल्या बैलांचा
तशी होते व्याकुळ झोपडी-झोपडी, तसा होतो विदीर्ण कप्पा-कप्पा
या मोडकळीस आलेल्या गावाचा.

विषण्ण दुपार हिंडते पोकळ गल्ल्यांमधून
अंगावर तापलेल्या लोहपट्ट्यांसारख्या झळा वागवीत
तेव्हा गुडगुडवीत रांजणातले पाणी घशात
झोपी जातात त्रस्त जीव, तेव्हा ओरडत असतात कावळे
भिंतीभिंतीवर आणि शिंक्यातल्या बुरशी चढलेल्या भाकरी
मेल्या मनाने सहन करतात मुंग्यांचे पायदळी तुडवणे.

चित्रविचित्र चेहरे माणसांसारखेच माणसांचे या,
कातडीवर सारे अत्याचार होऊन रापलेले, जेव्हा संध्याकाळची धूळ
गुरांच्या खुरांनी उधळलेली घेतात माखून तेव्हा मावळता सूर्य
शरमून गडबड करतो बुडून जाण्याची आणि चहाटळ चांदण्या
उगवण्यासाठी कलकलतात आणि थंड करू पाहतात
मृताच्या उघड्या डोळ्यांसारख्या नदीच्या पात्रातली निर्विकार वाळू.

मग येतो गाणे म्हणण्याची सक्ती असल्यासारखा चिडून वाहणारा वारा
आणि लापाटून नेतो वाळू घातलेली धुणी
तेव्हा डोळ्यांत भरत चाललेली धूळ दुर्लक्षून धावतात सैरावैरा बाया
आणि माणसे आखडून घेतात पोटाशी पाय फुंकर मारून दिवालगिरीवर,
कोठ्यातल्या आजारांसारखी पोरे असतात पडलेली तंगड्या फाकून

आणि अंगणात वावटळलेली बकरी
डालग्याखालच्या पिल्लासाठी दावे ओढीत करीत असते बँऽबँऽऽ

खिडक्या-दरवाजांशी फारकत घेतलेल्या भिंती असतात राखून इमान
कशाबशा छपराशी, जे दाखवीत असते सूर्याचा न् चंद्राचा चेहरा
टिचलेला अन् फुल्या मारलेला, भिंतींच्या आत बसल्या बसल्या.

उन्हाचा अन् पावसाचा कहर सोसून झाला की उरलेला काळ
पाव्हण्या पोरासारखा सुगीचा वारा हुंदडतो घरभर
तेव्हा घराघरातली सगळी माणसे पारावरच्या मारोतीला
शेंदुराची शपथ घालून बिनघोर विखुरलेली असतात शिवारभर.

## दुःख

दुःख दुःख म्हणतात ते शेवटी
असते तरी काय ?

दुःख म्हणजे हवा ?
जी असते दूषित अन् येते अवचित
खाणीतून उठलेल्या धुराच्या लोटासारखी
गुदमरवीत बेसावधाला ?

दुःख म्हणजे शिल्प ?
जे जाते फोडले निर्ममपणे निनावी हाताने
जातीय दंग्यातल्या टाळूसारखे ?

दुःख म्हणजे माणूस ?
जवळच्या नातेवाइकासारखा
जो असतो चोवीस तास एका कोपऱ्यात
बसलेला घुमा मुका भरल्या घरात ?

दुःख म्हणजे आठवण ?
आषाढी एकादशीला मटनदारू झोकल्याची....
देवापुढच्या दिव्यावर सिग्रेट पेटवल्याची....
कच्च्या पोरीला उभ्या ज्वारीत कुस्करल्याची....?

दुःख म्हणजे वरील सर्व काही....
किंवा नाही.

पण ज्याने दिले असेल दु:खाला
दु:ख हे नाव पहिल्यांदा
तो असेल कोणी नवोदित कवी
भाषेच्या सामर्थ्यावर अतोनात श्रद्धा असलेला.
आणि शब्द किती तोकडे असतात
आशयाच्या प्रकटीकरणासाठी
हे त्यालाही कळले असेलच—पण कालांतराने.

## असह्य

आत वाकून पाहताच गुळावरच्या माश्या गणकन् उठाव्यात
तसे विचार गोंगाटतात, भयभीत होतात,
आदळतात किराणा दुकानाच्या फरशीवर,
चिपकतात इब्लिस गल्ल्यांच्या भिंतींना,
लटकतात परक्या शेतातील झाडाला.

डोक्यावरून फिरणारा हात काढून नेतोय केस,
पाठीवरून फिरणारा हात करीत जातोय कोडाची पेरणी,
छातीवरून फिरणारा हात ठेवतोय सावध अंतर हाताएवढे,
गळ्यात गळा घालणारा हात करून देतोय आठवण
गनिमांच्या हाती पडलेल्या बेसावध कोणाची.

चोवीस तास कैचीत मान अडकवल्यासारखे,
सतत झाडेझुडपे चुकवीत चालण्यासारखे हे धास्तीतले जगणे.
दारुड्याच्या ओकारीचा वास भनभनावा कोंदट खोलीत
तसे वाटतेय या गावात.
ताडकन उठून ताडकन मस्तक नाही आपटले
समोरच्या दगडी भिंतीवर तर वाटते होईल स्फोट मेंदूत
आणि हजार तारे एकदाच तुटल्यासारखे
कवटीचे तुकडे उडतील अंतराळात.

सूर्याकडे पाहण्यासाठी उठावे तो येतेय डोळ्यांपुढे अंधारी.
हाती हवा कुस्करल्यासारखे सारे संकल्प.
आणि पाण्यावर पान पडल्यासारखे त्यांचे उच्चार.

भूतकाळ विहिरीसारखा जीत पडलीत खूप पाने.
पाने सडत चाललीत आणि पाणी पिवळे पडत चाललेय.

## उत्तर

झाडाने केले उत्तरासाठी कैक हात पुढे

तर मी हिंडलो नव्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या,
एकमेकींकडे पाठ फिरवून बसल्यासारख्या दिसणाऱ्या
इमारतींच्या शहरांतील गल्लीबोळांतून;
फिरलो खेड्यापाड्यांतून, गावाबाहेरच्या वस्त्यांमधून
जिथे उभी असतात खोपटे हाताला हात देऊन उभे राहताना
डुगूडुगू हलत असल्यासारखी;
पायपीट केली शेतांमधून भेगा पडलेल्या;
गेलो कारखान्यांच्या आणि विद्यापीठांच्या परिसरात :

निखाऱ्यांची तगमग गर्दी आणि पावसाळी अधिवेशनांचे पूर
दिवसभरचा चिखल तुडवण्यात गळणारा घाम
आणि दीड पैशाच्या खुर्चीवरून पाठीवर पडणारे बडगे
निनावी माणसांच्या तुफान गर्दीचा रौप्यमहोत्सवी आठवडा
आणि कपडे फेडण्याआधी क्षणभर ओठ दाबून
मेलेल्या आईची आठवण काढणाऱ्या पोरी....

तमाम इमारतींवर आणि खोपटांवर
काळे अन् लाल झेंडे लावून मी परतलो
माझ्या हताश हाडांची मुटकुळी घेऊन
तेव्हा झाडाने सगळी पाने आक्रसून घेतली
हात मागे घेतल्यागत.

आणि मी जमा झालो झाडाच्या बुंध्याशी.

## सावळी

पाखरांनी सांगू नये तुझी कहाणी
अन् वाऱ्याने गाऊ नयेत तुझी गाणी

ओस पडलेल्या खेड्यातून खडखडा धावाऱ्यात बैलगाड्या
अन् घुंगुरांचा आवाज विरून जाईपर्यंत रस्त्यावर उठलेली धूळ
खाली बसावी—असे तुझे येणे आणि जाणे

तू आणि तुझी सावळी रूपे
लाख कोनांनी चमचमणारी माझ्या पापण्यांच्या ओलेत्या कडांशी
आणि हात माझे चितारणारे तुला तुटपुंज्या शब्दांनी
जे काढावे लागतात ओढून गळ टाकून
त्या एका विहिरीतून जिच्या तळाशी
माझ्या खिन्न श्वासांचे बुडबुडे
हुलकावणी देत असतात मृत्यूला

तू येतेस अशी लाटेसारखी
घेऊन अनावर आवेगी लहरी
तुझ्या डोळयांच्या ओठांच्या हातांच्या स्तनांच्या मांड्यांच्या
अन् नेतेस लपेटून माझा देह त्या सावळ्या काळोखात
जेथे वाचता येत नाही मला एकाच ओळीत बसलेल्या
शंभर कावळ्यांसारख्या अक्षरांची वर्तमानाची लिपी
जेथे नाहीत शोधू शकत माझे हात
भूतकालीन शिल्पांचे खंडित अवशेष
जे असतात उधळले गेलेले काळाच्या आणि माझ्या विजोड टक्करीने

आणि डोळे हरवून गेलेले सावळ्या गंधाच्या लोटात
नाहीत पाहू शकत भविष्यातले काही
आपल्या परस्परात गुंफलेल्या शरीरांमध्ये
उरलेल्या जराशा अंतरातून

हात माझे थकलेले
धरून एका प्रदीर्घ कालखंडाचा नांगर
आणि पाय चिरून गेलेलें
चालून चालून त्या प्रदेशात जेथे टाचण्यांनी
टाचून ठेवलेली असतात फुले रस्त्यारस्त्यावर
आणि वाहनांच्या गर्दीत जेथे नसते फुर्सत
न्याहळून बघण्याची रस्ता
जेथे घडलेत कडाक्याच्या थंडीत ठेच लागून बोट रक्ताळावे असे
प्रसंग कित्येक
लागावा धक्का टचकन फोडावर बऱ्या होत आलेल्या अशा
कैक घटना
जेथल्या आठवणी जणू भेसूर किंकाळ्या विषण्ण मध्यरात्रीतल्या

हा तुझ्या काखेचा उद्दीपित करणारा उग्रमधुर दर्प
आणि सारा काळोख
गदगदा हलवून सोडणारी तुझी संयमित हालचाल
धावतेय माझ्या पोटऱ्यांकडून कमरेकडे एक सळसळ
जी परिचित तुला तेव्हापासून
जेव्हा खिडकीच्या काचा पुसण्याचे टाकून तू आलीस
तरंगत पिसासारखी माझ्या बाहूंमध्ये
आणि रुतलीस माझ्या कपाळावर गोंदल्यासारखी
हसलीस माझ्या ओठांवर सिग्रेटसारखी त्या

जी पीत असतो मी
डोक्यावरचे ओझे खांद्यावर आल्यावर
त्या हाताच्या बोटांत धरून जो असतो चिंब ओला
पिळल्याने रुमाल जो
असतो भिजलेला घामाने
कपाळावरच्या पाठीवरच्या छातीवरील केसांमधल्या

तू नाहीस तन्वंगी
तू नाहीस प्रमदा
आहेस एक प्रचंड झोत एक धो धो खळाळ
जो नेतो उडवून पिवळी पाने अडकलेली केसांत माझ्या
जो नेतो स्वच्छ धुवून बरबटलेली पावले माझी
जो जाणवतोय मला तुझ्या एकाच धक्क्यात हलक्याशा

तुला असतात मंजूर सारे दैवदत्त बोझे
आणि असतात बोललेले तू नवसही कुठल्याशा संताला
त्या दिवसासाठी जेव्हा असतील माझे श्वास
स्वच्छ वाहते मोकळे वाऱ्यासारखे
आणि नसतील माझ्या बाह्या शर्टाच्या ओल्या
आणि तू असशील उत्सुक माझ्या निमित्तमात्र हाकेसाठी
जिचे उत्तर म्हणून डोळे झुकवून तू देशील
माझ्या हातांत कलशासारखे श्रद्धापूर्वक तुझे सावळेपण
ज्याचे नाते तुला वाटतेय की आहे कोण्या नायिकेच्या रंगाशी
गाजलेल्या प्रेमकहाणीतल्या

मला लावायचे आहे कुंपण नुकल्याच हिरवलेल्या शेताला
कारण रोपे आहेत उभी धास्तीत अवघडल्यासारखी

मला आहेत बाजूला करायची ढेकळे माझ्या अंगणातली
पडलेल्या माझ्याच भिंतींची
मला पुन्हा एकदा पाहून घ्यायचाय या गावाचा देह
जो प्रत्येक पावसाळ्यात जातोय जराजरा खचून
टाकतोय एकेक अवयव वाहत्या पाण्यात निमूट

आणि मला घेऊन यायचेत काही क्षण सन्मानाने
जे ठेवलेयत इमारतींच्या बंदिस्त खोल्यांमध्ये गहाण
आणि मी घरेलू कर्जदार आहे त्या लोकांचा
ज्यांच्या फुलपात्रातले पाणी मी प्यालोय भर उन्हाळ्यात
आणि देऊ शकलो नाही एक शब्दही आभाराचा
त्यांचे शब्द जे पिकल्या फळासारखे असायचे माझ्यासाठी
त्यांच्या गुणगुणण्याची दिशा असायची माझे कान
त्यांची मऊसूत बोटे गलबलायची माझ्या भरल्या डोळ्यांसाठी
आणि आरसा दडवून
ते ठेवायचे त्यांच्या घरांच्या भिंतींचा रंग लख्खलख्ख प्रसन्न
यावी तकाकी माझ्या जर्द चेहऱ्यावर म्हणून
आणि मी असायचो मुकाट उभा
झेलीत त्यांचे आग्रह दुराग्रह आश्चर्यभरले खेदमिसळले डोळे
आणि लपवीत असायचो माझी झोळी
जिच्या बुडाला भोक—माझ्या हृदयाएवढे मोठे

मी जातोय उंच फेकल्या कमरेच्या सुळक्यावरून
त्या अंतराळात जेथे आधाराला म्हणून
हाती येतात पुन्हा स्तनांचेच कडे
आणि पोरक्या ज्योती
वाचवता वाचवता सोसाट्याच्या वाऱ्यापासून

भाजून गेलेले माझे तळहात
द्रवू लागतात जाणे कोणत्या उत्कट आर्जवाने

हे तुझे ओठ अस्पष्ट शब्द कुजबुजणारे
जसे डोळे शेतकऱ्याचे प्रार्थनारत
की जाऊ नयेत ढग शेतावरून बरसल्याशिवाय
ही भाषा स्पर्शाची जिच्या शब्दांचे उच्चार
उमटून घुमून जातात विरून पुन्हा दरीतच सावळ्या
आणि तुझे हात ओढणारे मला
माझ्या मालकीच्या पडक्या वाड्यामधून
जिथे उगवलीय हिरवळ जणू माझ्या स्वप्नांच्या कबरीवरची

चंद्र आक्रमत असता आकाशाचा मार्ग
वेढला गेला अचानक गर्द झाडीने मध्यरात्रीच
आणि तेथूनच झाला सुरू दिवस माझ्या जागरणाचा
ज्याला सोबत कुत्र्यांच्या कर्कश भुंकण्याची अविरत
ज्याला साथ घरामागे वाहणाऱ्या नदीच्या पुराच्या दणदणाटाची
जो प्रतीक्षात्रस्त एका सूर्याच्या उदयासाठी कधीचाच

भिजून गेलेली पुस्तके आणि उसवलेली बांधणी ग्रंथांची
उचकटलेले खिळे चपलांमधून आणि ढिले झालेले कडीकोयंडे
खोल रक्तात साचलेली खालसा संस्थानाची प्रेतकळा
गढूळ थर धुळीचे आणि
हरवून गेलेला पानांचा हिरवटपणा
गजबजून गेलेले माझे हृदय निःस्तब्धतेत
अन् पाय थाऱ्यावर नसल्यागत भरकटलेले

आणि तुझ्या ओंजळभर निष्ठांना
पाहायचेय आकाश आपल्यावर वाकलेले आशीर्वादासारखे
निर्वात प्रदेशात श्वास घेण्याइतके दुर्घट आयुष्य
तू करू बघतेयस खुले
बागेच्या मर्यादेत बागडणाऱ्या तुझ्या पंखांची ही हौस
न रुळलेल्या वाटेवर चालण्याची
तसे मीही नाकारले नाहीच तुला कधी
स्वीकारत आलोय सतत
फाटक्या पांघरुणातून दिसणाऱ्या चंद्रासारखे

सासूच्या धाकात वाकलेल्या
गर्भार बाईच्या केविलवाण्या चालीसारखे हे आयुष्य
मी दाबतोय एखादी जीवघेणी काळीजकळ
ऊर दडपून सराईतपणे
आणि तू चिंताक्रांत की
मी मोकळा का होत नाहीय ओझे फेकून दाटलेले

मी बोलतोय कसाबसा ओठांच्या फटीतून तुझ्यामाझ्या
आणि तू घेतेयस शोषून ओल माझ्या जिभेवरची
आणि माझ्या बेचिराख छातीवरील विस्कटून जाताहेत रांगोळ्या
हात फिरताहेत तुझ्या केसांतून अधिरे
तुझ्या कवेत अस्तित्व झालेय गुंत्यासारखे
आणि शब्द भेदरल्यासारखे सरपटत फिरणारे त्यातून
माझ्या खरखरीत चेहऱ्यावर आता धावताहेत वाफा
जलद हलताहेत तुझ्या नाकपुड्या
आणि झालेत तुझे हात आता

धरती झाकणाऱ्या आभाळाएवढे मोठे
मी जातोय जणू दूरदूर
खूप लांबवरच्या हाका जणू आता होताहेत पुसट
आणि माझ्या दुखऱ्या फुफ्फुसांचा भाता होतोय आततायी
आणि पाय तुझे लवचिक चिवट लव्हाळीसारखे

आणि आता या उतू जाणाऱ्या रिते होऊ पाहणाऱ्या क्षणी
एक विचार लखकन चमकतोय मनात
की मला पाठबळ का वाटत नाहीत
पाठीवर माझ्या आवळलेले तुझे हात

कंदिलाच्या प्रकाशात
लिहिताना दैनंदिनीची पाने
पायात पाय अडकल्यासारखे
लुंढकत राहतात शब्द.

एक थेंब जमा होतो पेनच्या निफेवर
आणि उतरतो हळूच
शुभ्र कागदावर, अर्ध्या ओळीवर,
भल्या मोठ्या पूर्णविरामाप्रमाणे.

मी थांबतो. पाहतो :
मेसळीचे घासलेट,
तिरपी कातरलेली वात,
भिंतीला टेकून ठेवलेला कंदील.

भिंतीकडची बाजू उजळ राखून
वातीने केलेला असतो काळाकुट्ट
माझ्याकडील काचेचा भाग आतून
शाईच्या थेंबाला दुजोरा दिल्यासारखा.

## फाटकं

घरी आलेल्या पाहुण्यांसमोर
काही फाटकं उघडं पडून नये
म्हणून आपलं जपावं
तसं तिच्यासमोर मी
सैनिकांच्या शिस्तीसारखे
शब्द ठेवतो
आणि राहू पाहतो
काचपात्रातील मासोळ्यांसारखा.
पण तरी ही साली इंद्रियं
झोपलाय असं समजून
चालावं ज्याला
त्यानं मध्येच तोंडावरून
पांघरूण काढून
फाजीलपणे व्यत्यय आणावा
गंभीर संवादात
तशी म्हणतात :
आम्ही पण *आहोत* बरं का....

अधांतर

तुझ्यामाझ्या संबंधात
गृहीत धरलेले एक अधांतर
वेदनेची प्रत्येक कळ सोसताना
फिरफिरून जिवंत होणारे.

ओल्या लाकडांसारखे
धुमसताहेत दिवस
आणि मी साजरा करतोय
प्रत्येक क्षण, लावून
आकाशदिवे मिणमिणते
या विराट अंधाऱ्या आकाशात.

प्रथितयशांचे तांडे मिरवत
जाताहेत आपल्याजवळून.
आपण बकाल डोळ्यांनी
भान सुटल्यासारखे
पाहताहोत एकमेकांकडे.

## फुले

फुले जी पाहतो आपण
असतात जणू कसलेली देठांना
बारीक लोखंडी तारांनी.

जेव्हा वाहतो वारा
तेव्हा तारा कणकणतात
आणि पाकळ्यांचे लहरणे
एका गरिबाने दुसऱ्याला
पाठवलेल्या शुभचिंतनापेक्षा
जास्त महत्त्वाचे नसते.

जेव्हा घेतो आपण तोडून
ती फुले ओंजळीत
तेव्हा त्यांचा वास
नासलेल्या ढगांसारखा
पसरतो आपल्या प्रसन्नतेवर.

# निवेदन

आम्ही जे तरुणपणी प्रौढ झालो
आणि धुळीत खेळण्याच्या वयात आकाशाशी बोलू लागलो....
तर तुम्ही संशोधून ठेवा आमच्या काळाची स्वस्त पिवळी पाने.

आम्ही उकलत गेलो रात्रीसारखे अस्पष्ट
आणि गुंडाळले गेलो निनावी चाकांवर धुक्यासारखे अंधुक
आज जेव्हा हसताहोत स्वतःला उपहासून
तेव्हा उचक्यांमुळे शाबूत राहतात हुंदके गळ्यात.

घरीदारी नवलाई शोधणाऱ्या उत्सुक डोळ्यांच्या प्रांगणात
सीमित होत गेले गंजलेल्या काळाचे विस्तार
आणि गोठलेल्या रस्त्यांचे स्पर्श बदलून गेले
चरितार्थाच्या अतिसामान्य घालमेलीत.

तुमच्याकडून नकोय क्षमा कुठल्याही सबबीखाली
पण आमच्या आठवणी काढा पुसून धुळीसारख्या सतत
ज्या ठरू शकतात कारणीभूत फुलांचे केस लवकर पिकण्यासाठी.

# प्रभात

गाव जळून विझल्याचा वास हवेत पसरला आहे,
पाखरांची शाळाही पिंपळावर भरलेली नाहीय,
वाऱ्याचा कंठ चिरून टाकल्यागत किर्र शांतता
आणि वर आभाळात सूर्य जणू विशाल दहशतीचा डोळा.

काल रात्री काय घडले : मुसमुसणाऱ्या मंद पावसात
फक्त भुंकली काही कुत्री आणि गिरणीच्या चाकात
तंगडे अडकल्यागत केकाटून झाली होती मुकी;
आणि ऐकू आले होते उद्दाम गुर्कावण्यांचे आवाज
परिचितसे, पण ओळखू न आलेले.

निश्चितपणे रात्री
मस्तवाल गेंड्यांचा कळप गेला असावा दौडत.
पाहा ना : निमओल्या मातीवर उमटलेल्या
त्यांच्या पावलांच्या खुणा
आणि खुणांचा आकार—चिरडलेल्या हृदयांसारखा.

बागेत बहार आली
आली, पण उधार आली

कळ्यांवर दवबिंदू पडले
पडले, पण उन्हाने ओरबाडले

पानांवर धूळ बसली
बसली, पण पुन्हा स्वतःच रुसली

फांद्यांवर मुंगळे चढले
चढले, पण सरडे मुक्याने रडले

पाचोळा प्राणपणाने उठला
उठला, पण वाऱ्याने दिसेनासा केला

दूर एक ढग दिसला
दिसला, पण तो धुळीचा लोट निघाला

थोड्या वेळाने माळी आला
आला, पण नजर टाकली फक्त
अन् निघून गेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८०५
दा. क्र. २३.८.९.७
क्रमांक १२८७५३
संदर्भ शाखा (स्थंक प्रत)

## घटना

ज्या रात्री चांदण्या दाखवीत नाहीत रस्ता
आणि पाखरांना आवश्यक होते घरटी सोडणे
तेव्हा वाराही होतो फितूर
वणव्याच्या हातात हात मिसळून.

माणसे येतात रस्त्यावर
आपापल्या दारांना कड्या घालून
आणि आभाळाकडे पाहत म्हणतात :
"किती उंच झेप ही पाखरांची,
किती विलक्षण वणवा, कित्येक वर्षांत न पाहिलेला!"

एक पीस अर्धे जळालेले येते तरंगत,
पोरगे झेलते त्याला आनंदाने;
आईबाप दोन्ही हातांनी आवरतात त्याला,
पाहतात कौतुकाने त्याच्याकडे
मग टाळतात एकमेकांशी नजर मिळवणे.

पोरगे मोठे होते काही वर्षांनी
आणि अलीबाबाच्या जुन्या पुस्तकात
पीस सापडताच चाळवू लागते स्मृती
विचारू लागते काहीबाही.

"अंऽ वणवाबिणवा? पाखरं वगैरे?
अंऽ होतं खरं काही....

दिवा मालवून टाक बरं. अंऽ....”
—म्हातारी माणसे कूस बदलत उत्तरतात.

प्रीतीच्या शपथा असतात एका बेसावध क्षणाचा आविष्कार
ज्या वेळी नाही कळत आपल्याला की शेजारच्या घरावरून
वारा काढून नेतोय छप्पर किंवा आठवतही नाही की
आपण लावून दिलेय सुस्वरूप बहिणीचे लग्न कुरूप श्रीमंताशी.

अविनाशी असतात जणू संकल्प आणि चिरंतन भावभावना
जणू जपलेला बुडबुडा एका काचबंद पात्रामध्ये;
विस्तारत जातात बुबुळांचे पापुद्रे कल्पांतापर्यंत
आणि विश्वाच्या व्यवस्थेमध्ये आपण असतो चपखल.

आदिम प्रेरणा चीत्कारतात, वाहतो रक्तातून नग्न लाव्हा,
ओठ गुलाम असतात आतून येतील तसे शब्द उच्चारणारे,
हुकुमावरून हात होतात कोमल दवापेक्षा
आणि मस्तक झुकलेले आकाशापेक्षा, मन विश्रब्ध झाडापेक्षा.

आव्हानास्पद वाटतात खूप दूरचे वणवे, काव्यांची तीव्रता
वाटते हास्यास्पद अन् जुलमी वाटतात सरळसूत वारे
आणि हात फुरफुरतात विशाल नगाऱ्यावर थाप देण्यासाठी
ज्यांना असते एरवी काम मस्तकाशी पश्चात्तापासाठी.

विफल होतात अशा वेळी पापण्यांची मेणघुणी घरे,
लक्ष पक्षी फडफडतात विस्तीर्ण आकाशाखाली चित्तातल्या
अन् एक उदास दुखरी धून कुरेदत असते अधूनमधून
जिला टाकत असतो आपण दडपून नटव्या कृतक आवेशाखाली.

आपण चालतो मग दोन पावले पुढे, जग मागे टाकून,
घेतो हातात आपले हृदय कलंदराच्या आयुष्य उधळण्यासारखे,
हसतो गडगडाटून कुठल्याही मान तुकवणाऱ्या झाडाला
आणि बेफिकीर हात खुपसून रिकाम्या खिशात पाहतो आकाशाकडे.

पुढे समजू येतात पाण्यावरील रेघा, वाळूवरची घरे, वाऱ्यावरचे मनोरे,
घाम जेवढा कपाळावर तेवढाच फुटतो तळहातावरही;
आपण मागतो एक ओंजळ पाणी कुणाच्या तुडुंब तलावातून
तेव्हा स्मरतो आपण प्रीतिपूर्व आयुष्य कुणाकडून आक्षेपित न झालेले.

तेव्हा सारे नकार कटू वाटतात नात्यापेक्षा, सारे निषेध किळसवाणे मैत्रीपेक्षा;
पुढे असतो आठवणींचा विदीर्ण भविष्यकाळ केविलवाणा मांडलिकापेक्षा;
आपण काळवंडतो ग्रहणातील सूर्यासारखे आणि वाट पाहतो त्या क्षणाची
ज्या क्षणी विसरले आपल्याला सारे विश्व तरी चालेल असे वाटते.

कीड लागलेल्या झाडांवर आता पाखरांना बसू देऊ नका.
त्यांची फळे नि:सत्त्व आहेत आणि फुले गंधहीन,
पाखरांचे पंख आहेत नवेले अन् चमकदार
आणि त्यांतील आवेग वाऱ्याशी स्पर्धा करणारा.

काही दिवसांपूर्वी हे झाडही होते स्वस्थ सुंदर;
पण एका रात्री बैराग्यांनी ठोकला होता याखाली मुक्काम,
केला स्वैपाक आणि दाखवला नैवेद्य याला
आणि त्यांनी गायलेल्या गाण्यांना वेंधळ्यासारखे ऐकत राह्यले गाववाले.

नंतर झाडाची पाने झाली सुरकुतलेली आणि फांद्या वाकड्या,
वारा वाहला तर त्यातून येतो आवाज पोकळ हाड फुंकल्याचा,
याच्या सावलीत बसतात आता अजाण फक्त वा नवे प्रवासी
अन् विश्रांती संपवल्यावर पंखझडल्या पाखरागत विषण्ण चालू लागतात.

विकट दिवसाच्या मृत्यूनंतर आणि छद्मी रात्रीच्या जन्माआधी
मी गोळा केलेले पाणी धूळग्रस्त क्षितिजावर सोडले ओंजळीने,
कत्रडशांचे ग्रीष्म आणि थेंबांचा कोसळ गोठवला एका रांगेत
आणि उलगडत्या अंधाराचे सूक्ष्म कपचे उचलले निमूट पापणीने.

टाचांच्या भेगांमध्ये झोंत्रणारी रस्त्यांची आंबसर ओल
आणि तळव्यावर फोडासारखे उगवून येणारे नाकेबंद अस्तित्वाचे अश्रू
दग्ध आयुष्याचे प्रतीक ठरू पाहता पाहताच मी सांडून गेलोय
जगाच्या कमंडलूतून आणि होतोय दूरस्थ ताऱ्याच्या चमकीसारखा.

वगळताना राहिलेले आणि दिशांनी गच्च कोंडलेले सनातन संकेत
जुन्या खोल व्रणासारखे चिकटून असतात त्वचेला, ज्यांच्या कुलीन
उपस्थितीचे ओझे टाळूवर केसांसारखे अटळ अविरत असते;
अगम्यही तितकेच जितके बंद दगडाच्या पोकळीत बेडकीचे जिवंतपण.

चटकन सापडत नाहीत नैऋत्य वायव्य ईशान्य बोटासरशी अन्
सामान्य निर्देशांना लागते ओशाळावे पुरातन पानांच्या हालचालीपुढे;
बेसूर होत जाते मग नसांतले वारे, पावले अडखळतात रक्तावेगाची
आणि निखळते चिरे स्वतः होऊन तोडतात चिरेबंदी बांधणीशी नाते.

टाके उसवत राहतात अनाहूत पराभवांचे अन् फटीतून वाहतात झळा,
आपण रोखतो दो हातांनी सूर्याची परिचित धडक नि ठेचाळतो पुन्हापुन्हा;
एखादाच असतो क्षण जेव्हा एखाद्या अपमृत्यूने आपण हादरतो बेहद्द
आणि शापित गंधर्वाचे उःशापासाठी नाक-गुडघे टेकवणे निःशंक नाकारतो.

## नंदीबैल

आता या नंदीबैलांमध्ये उरला नाहीय बैलाचा कुठलाही गुणधर्म बाकी.
पाठीवर माती टाकताच थरारण्याइतकी कातडी नाही राह्यलीय संवेदनशील,
यांच्या आता पितळेच्या कड्या लावून अलंकारलेल्या शिंगांना
उरली नाहीय हौस चिखलाचे घोस तुऱ्यासारखे मिरवण्याची
आणि घंट्या अडकवलेले गळे विसरलेत समोर आपल्या
गायीचा यार दिसताच डरकाळणे
आणि आता यांना आठवतही नाही मेघांच्या गडगडाटाला प्रत्युत्तर म्हणून
नागाच्या फण्यासारख्या शेपट्या उंचावून उंडारणे.

मानेवर जू न ठेवण्याचे आश्वासन
आणि आयत्या खळ्यात तोंड खुपसण्याचे प्रलोभन
यामुळे बैल झालेत मवाळ—आंड न ठेचताच.

आता कुठल्याही दारी हे बेलाशक उभे राहतात,
बायाबापड्यांकडून हळदकुंकू वाहून घेतात,
झुलीमधल्या झोळीत पसाभर पडले की खूष होतात
आणि गुबूगुबू असे वाजताच तडफेने मान हलवून
धन्याच्या भरभराटीची ग्वाही देतात.

## भिंत

ही कमरेएवढी पडकी भिंत
मी जोपासतोय तुझ्यासाठी,
भर दुपारी तर तिची सावलीही नाकारते
माझ्या शरीराला सामावून घेणे.

अर्थातच या जोपासण्यामागे
नाही कुठलाही भाबडेपणा
की कधीतरी तुला येताना पाहून
ही भिंत चालू लागेल मला घेऊन.

पण आशा एवढीच की
कधीतरी तू येशील
आणि तिला सारवून काढशील तुझ्या ठाम हातांनी
आणि तिच्या कोनाड्यांत रात्रीबेरात्री
बसतीला येणारे सर्प नि विंचू
घर बदलतील.

डरपोक

डरपोक माणसाची घृणा करू नका.

खरे म्हणजे त्याचा डरपोकपणा हा त्याच्या
संथपणे जाणाऱ्या जीवनाचा आधार आहे
आणि त्यासाठी तो स्वतः नाही
तर काही दादा लोकांचे कार्य
आणि तुमची निष्क्रियता जबाबदार आहे.

तुमच्या कोरड्या महान तत्त्वज्ञानात त्याला रस नाही.
तसा तर तो युगांपासून ऐकत आला आहे काहीबाही.
जिथेजिथे त्याची नि त्याच्या कुटुंबाची
कपडेलत्ते, खाण्यापिण्याची व्यवस्था आहे
त्या त्या ठिकाणाविषयी त्याला आस्था आहे.

कुठलाही ठराव टाकताच एक मिनिट उशिराने,
आजूबाजूला पाहून, त्याचा उजवा हात वर जातो
आणि बाहेर येताच आपल्या चौकटभर एकांतात
तो अल्पमतवाल्यांकडून निमूटपणे शिव्या खातो.

पण तरीसुद्धा त्याचे काहीच बिघडत नाही
कारण त्याच्या मते असे नाही तसे केले
तरीसुद्धा काही घडत नाही;
त्याने उजेडाकडे तोंड केले
तरी पाठीमागे अंधार कायम असतो

आणि अंधाराकडे पाठ केली
तरी नशीब उघडत नाही.

अर्धा डझन मुलांच्या नावांइतकेच फक्त
त्याचे सगळे जगण्याचे रस्ते पाठ आहेत;
ठराविक जागीच त्याचे पाय सराईतपणे थांबतात
आणि कुठल्याही दुकानदाराशी बोलताना
त्याचे काही उच्चार अगदी सहजगत्या लांबतात.

दर रविवारी त्याच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास येतो
आणि सगळे रूढ नियम धाब्यावर बसवून
तो दीड तास उशिरा उठतो.
अंघोळीसाठी तक्रार केली थंड पाण्याविरुद्ध
तरी सारेजण मुकाट्याने ऐकून घेतात
आणि एक सप्ताहभर खालमान्याची भूमिका करणाऱ्या
अन्नदात्याकडे बायको नि मुले आदराने बघतात.

त्याच्या अंगाला कोणी हात लावीत नाही
कारण त्याच्या डोळ्यांत ठाम आश्वासन असते
वाहतुकीचे नियम न मोडण्याचे
आणि कुठलाही नवा नियम त्याच्यासाठी सवय होऊन जातो
कालांतराने
जसे गाईच्या गळ्याला
ओझे वाटेनासे होते लोढण्याचे.

तो प्रसिद्धीसाठी पाठवीत नसला तरी
कविताही पाडतो.

त्यालाही जाणीव असते स्वतःच्या अस्तित्वाविषयी
त्याच्या मगदुराप्रमाणे;
दसरादिवाळीला तोही घरातली कोळिष्टके झाडतो.

तो दबलेला आहे, असहाय आहे, अगतिक आहे,
पण त्याच्या कवितांमधला अंधार
तुमच्या फोफशा उजेडापेक्षा प्रामाणिक आहे.

तुम्ही मात्र रंग बदलण्यात प्रवीण आहात.
तुम्ही ऑफिसमध्ये कळवळता, घरामध्ये किंचाळता,
स्वतःचेच तोंड चुकवता एक तारखेला
—अशी तुमची जात हरामी आहे
म्हणून कुठलाही आरसा तुमच्यासाठी निकामी आहे.

त्याचे तसे नाही.
समजा झालीच कुठे काही गडबड
तर तो मागतो
स्वतःसकट साऱ्यांची क्षमा भर रस्त्यावर.
मला वाटते, तोच माणसांमध्ये खरा आहे;
अंधारात स्वतःवरच थुंकणाऱ्या तुमच्यापेक्षा बरा आहे.

डरपोक माणसाची घृणा करू नका.

## शर्यत

इतक्या काही दूर गेल्या नाहीत
तुमच्या-माझ्या वाटा.

आपण एक शर्यत खेळू या :
आपापल्या नावा घेऊन किनाऱ्यावर पोचण्याची.

तुम्ही माझ्या नावेच्या
बुडाला छिद्र पाडायचे नाही;
मी तुमची वल्ही चोरून आणायची नाहीत.

शपथ एकच : खिलाडूपणाची.

तूर्तास : तुमच्या हातांत करपलेली फुले,
माझ्या ओंजळीत जळालेला मोहर.

## बौद्धिक

मी ताल धरीन,
तुम्ही गाणे म्हणा;
मी हुंदका देईन
तेव्हा तुम्ही कण्हा;

कोणी करील आरडा
तर त्यापेक्षा जोराने ओरडा;

म्हणजे आपण होऊ
खंदे पाईक
या खंडप्राय देशातील
महान लोकशाहीचे !

## गढी

गढी आहे.
गढीवर घुबड आहे
पण ते केवळ बुजगावणे आहे.

देवाच्या दयेने गढी खचण्यासाठी
सतराशे साठ पिढ्या जाव्या लागतील.

गावात गढी असली म्हणजे
इतरांना कुणाच्या तरी पायाशी
आश्रितासारखे बसल्याची भावना होते.

गढी खालून कोरशील
हळूहळू लपतछपत
तर अंगावर अवचित कोसळून
सहकाऱ्यांसकट संपण्याची शक्यता.

गढी एकदाच
उडवायची असेल धडाक्याने
तर थोडा धीर धर,
नेमकेपणाने वार कर.

पण कसेही करून गढी गेलीच पाहिजे.
लोकांना पटवून दे
गढी कोसळवण्याची आवश्यकता
आणि कारणे.

अगदी....गढीच्या बुडात
लाखमोलाचा खजिना आहे
असे सांगितलेस तरी चालेल....

गढी जाणे महत्त्वाचे !

## वाघ

वाघ येतो दबकत दबकत,
डोळे विस्तारून पाहतो वळून
शुक्राच्या चांदणीकडे.

भुतांच्या सावल्यांसारखी निश्चल काळी झाडे
एकदाच सरसरून स्तब्ध होतात,
माकडिणी लटलटा कापतात चिंचेच्या झाडावर
पिलांना चीं चीं करणाऱ्या
पोटांशी घट्ट आवळीत.

वाघाच्या डोळ्यांत उतरते रक्त आदिम,
वाघाच्या जिभेवर खळखळते चव अनादी;
वाघ सरतो दोन पावले मागे,
मागचे पाय घेतो वाकवून
आणि राहतो उभा पवित्र्यात.

—घाणेरड्या गारगोट्यांसारखे
बैलांचे डोळे भिरभिर चमकतात
गोठ्यातल्या शेणुटल्या अंधारात;
एक बैल मुततो बदबदा
चिखल माजवीत
अन् सारे बैल खडखडा उठून राहतात उभे.
डालग्याखालचे कोंबडे
झोपेतच ओरडल्यासारखे आरवते.

कामकरी उठतो
मळ्यावरून उतरतो
बैलांपुढची वैरण पाहतो
गोठ्याच्या बाहेर येतो
वाघाच्या बैठकीवर लघवी करतो
सुडीतल्या कडब्याच्या चार पेंढ्या
बैलांपुढे आणून टाकतो
मळ्यावर पुन्हा चढून चिलम पेटवतो
पोराच्या पाठीत रट्टा घालून म्हणतो :
"पांड्या, सुक निंघाला रं!
तू शेनबिन काढ
तंवर मी जराक्सा डोळा लावतो."

एव्हाना
वाघाचा परतीचा प्रवास
संपत आलेला असतो.

## शोकांतिका

मी म्हणालो : हरामखोर.
तो मख्ख राहिला.

मी ओरडलो : समाजकंटक.
त्याचे तुकतुकीत गाल
स्मितासाठी गोळा झाले,
उजवीकडचा सोन्याचा दात चमकला.

मी कडाडलो : देशद्रोही.
त्याने डाव्या हाताचा
रेषा नसलेला विस्तृत तळवा
माझ्यापुढे पसरला.

मी झिडकारून
चवताळलो : मानवतेचा शत्रू.
त्याने दोन्ही हात
कमरेवर ठेवले शांतपणे
अन् दगड झाला.

मी पिसाळलो,
विटेचा तुकडा
उचलण्यासाठी वाकलो.

त्याने चटकन हालचाल केली
अन् उजवा हात खिशात घातला.

मी थांबलो.

काय काढतोय तो ?
पिस्तूल की नोटांचे पुड्ल....
सावध अंदाज घेऊ लागलो.

पाखरांजवळ
तसे पाहिले तर
काही नसते
लुसलुशीत मांसाशिवाय
आणि मेदरल्या
स्वप्नाळू डोळ्यांशिवाय.

पाखरे साली
हुशार असतात.
ती बसत नाहीत
कधीच माणसांच्या
वळचणीला.
वाळीत टाकतात माणसांना
विसाव्या शतकात.

पाखरे लालची
असतात दाण्यांची
—पण पिंजऱ्याबाहेरच्या.
पिंजऱ्यांतले पोपट
पाखरांत जमा नसतात.
त्यांना मिठ्ठू म्हणतात.

पाखरे साली
हरामखोर असतात.

तसे पाहिले तर
त्यांच्याजवळ असते
फक्त हेटाळणी
आणि विनापंख
अस्मान गाठण्याची
माणसाला चिथावणी

## मी येईन

मी येईन
तू दरवाजाशी उभी अस
चौकटीला टेकून
म्लान चेहरा
नि उत्सुक डोळे घेऊन

मी येईन
शब्दांची फुले घेऊन
आणि आल्या आल्या
फाटकातूनच उधळीन तुझ्यावर

किंवा मला उशीर होईल थोडा

आयुष्य आणि शब्द यांची
सांधेजोड करीत
कुठल्यातरी जुनाट इमारतीत
मी चेहरा ताजा राखण्याच्या
प्रयत्नात असेन
तुझी आठवण येत असेल मला
अन् मी
उदासीचे मळभ
बळ एकवटून दूर लोटीत असेन

मी येईन

तू दुरून दिसताच
सिग्रेटच्या रिकाम्या पाकिटासारखा
पटकन देईन फेकून दिवसभराचा
थकवा रस्त्याच्या कडेला
माझ्या सायकलीचा वेग
कमालीच्या आनंदाने मंदावेल

मी येईन
तू दरवाजाशी उभी अस
चौकटीला टेकून

कदाचित उशीर होईल थोडा
आत वळू नकोस उदास होऊन
कृपा करून

## अखेर

घात झाला!
श्रीमंत, घात झाला!

फाटके लोक
आत येताहेत फाटकातून
कब्याकोयंड्यांतील
अनुप्रासाची पर्वा न करता!

कढीपुरणाला बेइमान
झालेत बाशिंदे!
फुकट पोसलेल्या फितुरांनी
खजिन्याच्या किल्ल्या फेकून
पळ काढलाय!
कानातला मळ काढीत
बसणारेही मळकटांना
जाऊन मिळालेत!
अधूनमधून भुवई तिरपी
करणारे भयंकर निघालेत
अन् घुम्यासारखे दरबारात
गप्प बसणारे आता
लोंढ्यांच्या अग्रभागी
गर्जना करताहेत!....

श्रीमंत बुद्धिबळे

खेळत होते.
त्यांनी हत्ती घोडे
पुढे सरकवले.
उरलेल्या प्याद्यांचा
भरवसा येईना.

श्रीमंत पळत गेले
गच्चीवर
तोच खालून निरोप आला :
वजीर गेलाय;
राजा वाचवणे कठीण,
व्यूहात फसलाय.

श्रीमंत आतून हलले,
गहिवरले.
एकेका कोपऱ्यातून
पांढरी निशाणे निघून
हत्तीघोडयांच्या चीत्कारासमवेत
दुष्मनासमोर
माना वाकवू लागली.

श्रीमंतांनी एकवार राजवाडा
नि परिसर न्याहाळला;
वाकून खाली पाहिले
अन् स्मित केले :

खाली
चौकात
एक नादुरुस्त कारंजे
आपल्या गंजलेल्या
लोखंडी बोटांनी
श्रीमंतांना खुणावत होते.

## शिक्षण

मुलांनो, सांगा :
आपल्या देशाचे नाव काय?
: हिन्दूस्तान.

आपल्या देशाला स्वातंत्र्य
केव्हा मिळाले?
: पहिलं स्वातंत्र्य
१५ ऑगस्ट १९४७ रोजी,
दुसरं....

आपल्या देशातील
प्रमुख नदी कोणती?
: सिंधूऽऽ

बडोदा शहर
कशासाठी प्रसिद्ध आहे?
: डायनामाइटसाठी.

बांगला देशमधून
कशाची निर्यात होते?
: निर्वासितांची.

.....................

.....................

मुले पटापट उत्तरे देताहेत,
शिक्षक शहारताहेत,
केविलवाण्या नजरेने
शाळातपासनिसाकडे पाहताहेत.

वर अहवाल जाताहेत,
वरून आदेश येताहेत :
मुलांचा एकांगी विकास होतोय.
तो सर्वांगीण होईल
इकडे लक्ष द्या.
त्यांना मूलभूत शिक्षण द्या.
शाळांमध्ये येणारी
वर्तमानपत्रे बंद करा.

श्वापद

रोज रात्री
दरवाजाच्या फटींमधून
वाहत्या वाऱ्याबरोबर
घुरट असा वास येतो.

भयानक डरकाळीबरोबर
भिंतींचे पोपडे फडफड
जमिनीवर पडत असल्याचे
स्वप्न पडते मला
आणि मी दचकून जागा होतो.
बायकोला आश्चर्य वाटते.

ती सांगते की
झोपेतही माझा चेहरा
आक्रसलेलाच असतो.

कधी ती
पाणी प्यावयास
जागी होते
तर पाहते
की मी टक्क जागाच.

फटफट उजाडताच
मी दरवाजा

उघडून पाहतो :
उंबरठ्याजवळच
रस्त्यावरच्या धुळीत
श्वापदाच्या पंज्यांच्या
स्पष्ट खुणा.

मी आवाजाने दचकून
मान वळवतो तर
बायको म्हणत असते :
थोडं बाजूला सरकता का....
मला इथं सडा टाकून
रांगोळी काढायचीय....

मी डोळ्यांतले भाव लपवून
आत वळतो चटकन.
बायकोची अजून
श्वापदांशी ओळख नाहीय.

## ज्ञा न प्रा प्ती

अठराव्या वर्षी मी (कायद्यानुसार)
सज्ञान झालो.

ही ज्ञानप्राप्ती भयंकरच (कायदेशीर)
घातक ठरली.

प्रत्येक बेकायदा गोष्टीसाठी मला
तयार व्हावे लागले
(कारण मला न्याय पाहिजे होता).

कोर्ट कचेऱ्या वकील पोलीस साक्षीदार
या देशाच्या न्यायव्यवस्थेतील
प्रत्येक घटकाशी परिचित होताना
मी अडाण्यासारखा वागत गेलो.

आता मला प्रश्न पडलाय:
हा सोयिस्कर अडाणीपणा
या देशाच्या
कोणत्या कायद्यात बसतो....

संकेत

बामणांच्या जिभांनी
भाटगिरीचा भार वाहिला;
रावसाहेबांसाठी लवंगविलायची
पेश करण्यात
मारवाड्यांची हयात गेली;
तिरप्या टोपीचं टोक राखण्यासाठी
पाटीलदेशमुखांनी दिल्लीच्या
पायरीवर नाक घासलं;
कुणब्यांनी पागोट्याच्या बाहेर
पाहण्याची तसदी घेतली नाही;
महार खानदानी व्रत समजले
जोहार करण्याला.
आहे का एखादी तरी
जात माणसाची
जी माणसासारखी जगेल,
वेगळी वाट धरेल ?
—मित्रानं भुईवर थाप मारून
आकांतानं प्रश्न केला.

मी समोर बोट दाखवलं :
तीन वर्षांचं कैकाड्याचं
एक काळं कार्टं
रस्त्यावर उभ्या मंत्र्याच्या

मोटारजवळून जात होतं
गोळा केलेलं कुडतं
पोटावर मुठीत घट्ट धरून,
भरलेलं ढुंगण अन्
इवलीशी नुन्नी उघडी टाकून,
बेदरकार....

## सभा

स्वतःच स्वताशी संवाद करीत मी बसलो होतो.
प्रथम आठवणींच्या तबकडीवर सुई फिरली
बराच वेळ.
नंतर माझ्या पापण्यांनी परस्परांजवळ येऊन
गंभीर चिंतन केले.
मग माझे डोळे उघडले निळ्या आकाशात
अन् निःशब्द बोलत राहिले.
मी आक्षेप घेतला काही गोष्टींना प्रतीकात्मकः
बोटांची चाळवाचाळव करून मानेमागे हात
बांधले.
आणि उत्तरादाखल बोलत राहिलो ओठ घट्ट मिटून.

बऱ्याच वेळाने आरामखुर्चीतून उठल्यानंतर
खोलीत जाण्यास वळलो तो
मला जाणवले एकदमच :
वारा सुटलाय
पाने हलताहेत
दरवाजा हेलकावे घेतोय
अन् आवाज घरातले रस्त्यावरचे
सगळीच कशी घाई गर्दी गोंगाट
हल्लकल्लोळ ...
जणू सभा संपल्यानंतरची गडबड
शांतपणे ऐकून घेणाऱ्या माझ्या असंख्य श्रोत्यांची.

## फुलं फुलं

१.

फुलं जेव्हा उन्हामुळं
पांढरी पडतात :
वाह्णाऱ्या वाऱ्यात
ऱ्हासकालीन नौबती
झडतात.

२.

फुलांचं आयुष्यच मुळी
असतं
चार दिवसांचं
जसं ल्हानपणीच मरावं
मूल
लाडानवसाचं.

३.

फुलांचा आणि भुंग्यांचा
संबंध मतलबी,
मधापुरता.
तरीही फुलं विचारतातच :
पुन्हा याल का
आमच्याकरता ?

४.

फुलं ऋतूंवर अवलंबून
असतात;
मुळं पाणी किती शोषून
घेतात
यावरही.
पण हे सगळं ती विसरतात
देवाच्या पायावर गेल्यावर
किंवा पोरीच्या केसांत
गुंतल्यावरही.

५.

सत्कार असो वा पुष्पचक्र
फुलांचं मरण निश्चित असतं.
अर्थात म्हणजेच
शहीद होणं.

६.

फुलं जळकुकडी नसतात.
एकमेकांच्या नावानं
बोटं नाहीत मोडीत.
नेहरूंच्या छातीवर
विसावल्यानं
गुलाबाचा कोणी द्वेष
नाही करीत.

सारी फुलं खुशीत असतात
जातभाईचा सन्मान झाल्यागत.

७.

फुलं मातीत पडतात,
मातीलाही सुगंध देतात
—अशा कविताही होतात
तयार. त्यांच्या ओळी
आपल्या मनांत शतकानुशतकं
दरवळतील
मातीसारख्या प्रत्येक
म्लान वेळी.

८.

फुलं माळली
रांडेनंही वेणीत
तरी तिच्या निष्कलंक
आत्म्यासारखी हसत
असतात
—पतिव्रतेच्या तेजानं.

९.

फुलांवर निःशंकपणं
भरवसा ठेवा.
त्यांचं मन त्यांच्या

स्वच्छ शरीराहून
वेगळं नसतं.

१०.

फुलांचा रंग मऊ
असतो
आणि शरीर
गंधित.
फुलं लावतात वेगळं
वळण
सवयींना आपल्या
पंचेंद्रियांच्या.

११.

काही फुलं
जरी नाही दिसली
टवटवीत
गोबऱ्या मुलाच्या
निरोगी हास्यासारखी
तरी नाराज नका होऊ
त्यांच्यावर.
काही मुलांचेही चेहरे
असतातच ना सुकलेले
निकृष्ट आहारामुळं
वा अन्य काही कारणानं....

१२.

काही फुलं जी सुकतात
वेलीवरच,
गळून पडतात
वेलीच्या पायाशी.
आळं सकस होतं
त्यांच्या आयुष्याचं
वाया न जाता
खत झाल्यानं.

१३.

फूल
म्हणजे स्वप्न असतं—
हळव्या मनाचं,
क्रांतदर्शी डोळ्यांचंही.
कोणी विचार केलाय कधी
फुलाचंही एखादं
स्वप्न
असेल म्हणून?

१४.

फुलं
तसं म्हटलं
तर निरुपद्रवी.
काही भोळसर
काही आर्जवी.

काही फुलांवर मात्र
दंतकथांची सावली.
उदाहरणार्थ :
गुलबकावली.

१५.

अनुल्लेखानं वाळलं तर
किंवा
पायाखाली चुरगाळलं तर;
पण
याहून मोठा
अन्याय होईल फुलांवर
त्यांचं नाव
जीवनावश्यक वस्तूंच्या यादीतून
गाळलं तर.

१६.

फुलांचा जन्म
माणसाच्या आधीचा.

फुलं
माणसासाठी असतात.

फुलं
बसतात रुसून
अधूनमधून
माणसं फुलांसारखी

कां नाही झालीत अजून
म्हणून.

## सावज

*...वे जिसकी पीठ ठोंकते हैं—*
*उसके रीढकी हड्डी गायब हो जाती है...*

*—'धूमिल'*

मेहरबानी करून
माझ्या पाठीवरून
हात फिरवू नका;
माझ्या पाठीचा कणा
गायब होऊन जाईल.

तुम्ही ज्याच्या डोक्याला
स्पर्श करता
आशीर्वादाच्या हाताने
त्याचा मेंदू एकारतो.

तुम्ही ज्याच्याशी
घसट वाढवता
तो लवकरच
घुसमटून संपतो.

तुमच्या हातात
हात मिळवल्यानंतर
भास झाला मला एकदम
माझ्या मनगटाला
पंजाच नसल्याचा.

तुमचे ढिम्म राहणेही
भयंकर असते;
तुमच्या डोळ्यांतील भुलावे
आम्हांला वाहवून नेतात
कुठल्या कुठे.

पण आता आम्ही
सावध झालोत.
बळी पडलेल्यांचे फोटो
आम्ही आमच्या
कार्यालयात लावलेत
आणि त्यांच्या पुण्यतिथ्यांना
आम्ही शपथ घेतो
आता फोटोंची संख्या
वाढू न देण्याची.

तुमचे जाळे हळूहळू
निकामी होत चाललेय
अन् योजना कालबाह्य.
तुम्हांला सावज
सापडत नाहीये आजकाल.

पण तुमची चटक
अनावर आहे.
तुमची सवय
जात नाहीय.

पाहा....
पाहा....
तुम्ही स्वतःच्याच
मस्तकावर
हात ठेवताहात....
सांभाळा....
सांभाळा....
अरे....

घोळ

कवी बाहेर पडतो देशी दारूच्या गुत्त्यातून
तर दरवाजात भेटतो त्याचा मित्र.
दोघेही आश्चर्याने थक्क क्षणभर परस्परांकडे पाहून,
मग खळखळून हसतात.
कवी दारूवर चढवतो एक शेर :
कहाँ मयख़ानेका दरवाजा 'ग़ालिब' और कहाँ वाइज़
पर इतना जानते हैं कल वो जाता था कि हम निकले

मित्र, मालक आणि गुत्ता अख्खा
ग्लास-बाटल्यांच्या आवाजासकट
कवीला धरतात उचलून
वाहवाच्या लाटेवर.

पुन्हा बैठक ग्लास शेर.
घर संसार नौकरी प्रश्न प्रश्न
कवी दारूमिसळले पाणी फिरवतो सगळ्यावर.
देश काल परिस्थिती
कवी ग्लासाच्या टाचेखाली दाबून ठेवतो.
समाज भ्रष्टाचार राजकारण
कवी जळती सिग्रेट चुरगाळतो त्यावर.

प्रत्येक ग्लासाबरोबर कवी भडभडून बोलतो.
नकार देतादेताच होकार देत राहतो
मालक दुकान बंद करण्याचे सांगेपर्यंत.

कवी बाहेर पडतो. पाहतो
तर मित्र केव्हातरी निघून गेलेला.
रस्ता शून्य रहदारीचा.
गार गार वारा कवीच्या मस्तकाभोवती.

कवी स्वतःशीच हसतो शहाण्यासारखा.
रोमँटिक वास्तवता आणि वास्तविक रोमँटिसिझम
यांचा घोळ घालत मनात
कवी वळतो शेवटच्या ग्लासासाठी
तर गुत्ता बंद.

नंतर बराच वेळ जळत्या सिग्रेटचा लाल ठिपका
काळ्या रात्री रस्त्यावर हलत असलेला
उशिरापर्यंत जागून घरी परतणाऱ्या
विद्यार्थ्यांना दिसत राहतो.

## शत्रू

शेतकऱ्याचा पटका
तालुक्याच्या ऑफिसात
साहेबांनी कचाकचा तुडवला,
बाबूंनी तुडवला,
चपराशांनी तुडवला.

श्रीमंत बापाच्या पोराने
मारलेल्या धक्क्याने
चक्कीवर चालवलेले
दळणाचे टोपले सांडावे
अन् गरिबाच्या पोराने
धुळीतले दाणे एक एक करून
हळूहळू गोळा करावेत
तशी शेतकऱ्याने
आपली अब्रू सावडली
अन् भयाण रस्त्याने
चालू लागला....

त्याची हिंमत नाहीये
घरी परतून
वाढून ठेवलेले ताट
पाहण्याची.

शहर मागे सोडून

तो निर्जन जागी येतो
अन् झाडाला पटका बांधून
गळफास लावून घेतो.

शेवटच्या क्षणी
त्याच्या डोळ्यात विद्वेष असतो
अन् ओठावर शिव्याशाप
जे
साहेब, बाबू वा चपराशी
यांनाच खराखुरा
शत्रू समजून
दिले जात असतात.

पारध्यांच्या पालांमधून
किंवा वडरांच्या वस्तीतून,
वैदूंच्या तंबूंतून
किंवा डोंबाऱ्यांच्या झोपडयांतून
कच्चं मांस तळल्याचा
अन् मोहाच्या दारूचा
उग्गिर वास दरवळतो.

खुल्या आभाळाखालच्या
तीनदगडी चुलीत
उक्कड बसून भोंगळी पोरं
जाळात वाळल्या काडया
सरकवीत असतात.

मग भररात्री सुरू होतो दांगडव.
नवऱ्या लोकांच्या मारामाऱ्या
अन् बायकांचं झिंझोटणं.

अन् मग सारं संपल्यावर
होणाऱ्या मायबापाच्या झटापटीत
एखादी लाथ पोरांच्या कंबरडयात बसते.
पोरं मुकाट उठून पालाच्या बाहेर येतात,
मधल्या आगटीच्या भवती
आपल्या मुटकुळ्यांचं रिंगण करून झोपतात.

सकाळी उठून तोंड न धुताच
खरकट्या बायकांकडे न पाहता
आपली पाषाणयुगीन शस्त्रं घेऊन
माणसं गावाच्या विरुद्ध दिशेनं निघतात.

बायामाणसं जातात रानात
अन् शिसवी देहांना झटणाऱ्या
नजरांचा थरकाप उडवीत
हक्कानं गवऱ्या काटक्या गोळा करतात.

बाया हवेपेक्षा झपझप चालतात,
पुरुष लव्हाळीपेक्षा लवलव वाकतात;
बायांचे तळपाय काट्याकुट्यांना लीलया चिरडतात,
पुरुषांचे तळहात बायांच्या तळपायांसारखे असतात.

पाठकुळीच्या बिऱ्हाडासाठी वणवण सुरू असते.
अंगाखालची जमीन चार दिवसाकाठी बदलते.
पालाच्या फाटक्या कपड्याला आतून
जुनी कॅलेंडरं अन् रंगीत चित्रं
चिकटवली अडकवली दिसतात
अन् भर दुपारी सुस्तावून सगळे झोपल्यावर
पोरं चित्रातल्या सिंहाचे दात मोजीत असतात.

मी म्हणालो, 'एक खिडकी आकाश द्या.'
मालक म्हणाला, 'दुकानात माल
शिल्लक आहे का तुम्हीच पाहा.'

मी शोधक दृष्टी फिरवली :
जळमटांचे खोके,
अंधाराचे ओघळते कोपरे,
कुबट वासाचे पिपे
अन् घाणेरडे हाग्रे रंग
प्रत्येक बासनाला लावलेले
अन् छोट्याछोट्या डब्यांवर खडूने
मोठ्या किडीमिडी अक्षरात
लिहिलेली अशुद्ध नावे.

मी हताशपणे विचारले, 'कुठंच
मिळणार नाही का?'
थकलेल्या दुःखी स्वरात मालक म्हणाला,
'नाही.
काय दिवस आले पहा.
मी तरुण होतो तेव्हा खिडकीएवढं आकाश
फक्त दरिद्री वृत्तीचे लोक नेत.
तेव्हा फार स्वस्ताई होती.
दुकानात आकाश मावत नव्हतं.
प्रत्येकजण स्वतःच्याच हृदयात ठेवत असे.

कोंबून कोंबून ठेवण्याचा प्रयत्न करावा लागे
तर ते त्याच्या चेहऱ्यावर ओसंडत असे.'
—तो पुन्हा वहीखात्यात गर्क झाला.

मी निराश होऊन परतत होतो, अन् पुन्हा पुन्हा
खरवडून आत आत हृदयात हात घालून पाहत होतो
थोडेतरी आकाश कुठे लागते का ते....

## शिकवण

मेघना, माझी मुलगी,
चार महिन्यांची आहे.
काही दिवसांपूर्वी ती अ, ई, ओ, ऊ असे
स्वर काढीत असे.
आता ती प्रयासाने ओठ गोळा करून
बऽ, बूऽऽ असे आवाज काढते.
तिची इच्छा नसतानाही
तिला पाणी पाजताना
गळ्र् अळ्र् असे ध्वनी तिच्या
गळ्यातून येतात.
मी मुद्दाम तिच्याजवळ उभे राहून, वाकून,
माझ्या ओठांनी
बबबब्, अबबऽ, अर्र, बर्र, ब्रीऽ असे
सकृद्दर्शनी निरर्थक असे
शब्द उच्चारतो.
तिला प्रोत्साहन मिळते.
तीही म्हणू पाहते.
मी कोशीस करतोच आहे,
तिचाही प्रयत्न चांगला आहे.
माझी खात्री आहे
ती लवकरच 'ब्र' उच्चारेल.

वणवा : १०.१०.७२ : कवठा
वेळा : १५.२.७३ : कवठा
आताशा : ८.३.७३ : कवठा
मी उभा : २२.३.७३ : कवठा
ज्वरग्रस्त ० : २२.३.७३ : कवठा
सामोरी : २४.३.७३ : कवठा
शब्द : २७.३.७३ : कवठा
डोळे : –.४.७३ : कवठा
वाळवी : ८.६.७३ : कवठा
तो : १८.६.७३ : कवठा
वाट : २.८.७३ : कवठा
शाप : ६.८.७३ : नागपूर
खिडकीपार : १७.८.७३ : नागपूर
शेजारधर्म : १०.१०.७३ : कवठा
पक्षी : १४.१०.७३ : कवठा
एका सामान्याचे स्वगत :
१३.१२.७३ : नागपूर
शेजारचा ० : –१२.७३ : कवठा
संबंध : २.१.७४ : कवठा
निर्विकार : ६.२.७४ : नागपूर
आवाहन : ६.२.७४ : नागपूर
रंग : १३.२.७४ : नागपूर
दिंडी : २४.२.७४ : नागपूर

शेजारझाडे : १.४.७४ : कवठा
पहाट : ४.४.७४ : नागपूर
आयुष्य : १५.४.७४ : नागपूर
तर पुन्हा : ९.६.७४ : कवठा
शतपावली : १२.८.७४ :
नागपूर - अकोला
आकाशहीन : २१.९.७४ : नागपूर
सुरुंग : २९.९.७४ : नागपूर
काही जण : ९.१०.७४ : नागपूर
क्षितिजावर : १०.१०.७४ : कवठा
हरेकाच्या : २९.१०.७४ : नागपूर
प्रारंभ : ३१.१०.७४ : नागपूर
आहोटीचा खेळ :
१३.११.७४ : कवठा
निळाई : ५.२.७५ : नागपूर
एका रात्री : १९.२.७५ : नागपूर
खुर्ची : १३.३.७५ : नागपूर
गवत : १४.३.७५ : नागपूर
जत्था : २०.३.७५ : नागपूर
कावीळ : ४.५.७५ : नागपूर
उपदेश : २४.५.७५ : कवठा
कविता : –.५.७५ : कवठा
गाव : १.७.७५ : कवठा

दुःख : ३.७.७५ : कवठा
असह्य : २१.७.७५ : कवठा
उत्तर : १६.८.७५ : कवठा
सावळी : १८-१९.८.७५ : कवठा
कंदील : १८.९.७५ : कवठा
फाटकं : २७.१०.७५ : कवठा
अधांतर : –.१०.७५ : कवठा
निवेदन : –.–.७६ : कवठा
फुलं : २९.१०.७५ : कवठा
प्रभात : २४.१.७६ : कवठा
बाग : २५.१.७६ : कवठा
घटना : २७.१.७६ : कवठा
प्रीतीच्या ० : २८.१.७६ : कवठा
झाड : ८.२.७६ : कवठा
एखादाच क्षण : १०.२.७६ : कवठा
नंदीबैल : १६.२.७६ : कवठा
भिंत : २४.४.७६ : कवठा
डरपोक : २१.६.७६ : कवठा
शर्यत : २३.६.७७ : कवठा
बौद्धिक : २३.६.७७ : कवठा
गढी : २१.३.७८ : कवठा
वाघ : २२.३.७८ : कवठा
पाखरं : २३.४.७८ : कवठा
शोकांतिका : २३.४.७८ : कवठा
मी येईन : २८.१२.७८ : कवठा
अखेर : १८.४.७९ : कवठा
शिक्षण : २१.४.७९ : कवठा
श्वापद : २९.५.७९ : कवठा
ज्ञानप्राप्ती : १८.७.७९ : कवठा
संकेत : २८.७.७९ : कवठा-वाशीम
सभा : ११.१०.७९ : कवठा
फुलं फुलं : २०.११.७९ : कवठा
सावज : ८.३.८० : कवठा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७०५
दा. क्र. २३६५४
संदर्भ शाखा (स्थल
REFBK-0023894
REFBK-0023894